रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १८ • अंक ११६
www.ramprahar.com

• गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

शाळकरी मुलीच्या हाती रिक्षाचे स्टेअरिंग; खालापुरात प्रकार/२

जनावरांची अवैध वाहतूक; पाच जणांना अटक/७

मुंबई विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत एमपीएससी कॉलेजचे सुयश/८

## दिल्लीतील स्फोट हा दहशतवादी हल्ला; केंद्राची घोषणा



**नवी दिल्ली :** दिल्लीतील ऐतिहासिक रेड फोर्टजवळ झालेल्या कार स्फोटाला केंद्र सरकारने 'दहशतवादी हल्ला' म्हणून घोषित केले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने या हल्ल्याचा निषेध करणारा ठरावही मंजूर केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षा विषयक कॅबिनेट समितीच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रसारमाध्यमांना संबोधित केले. त्यांनी या स्फोटाचे वर्णन राष्ट्रविरोधी घटकांनी केलेले घृणास्पद कृत्य असे केले. १० नोव्हेंबर रोजी रेड फोर्टजवळ देशाने एक भ्याड दहशतवादी हल्ला पाहिला आहे. आरोपी, त्यांचे साथीदार आणि त्यांना मदत करणारे लोक यांना जलद न्याय मिळवून देण्यासाठी उच्च प्राधान्य आणि व्यावसायिकतेने तपास करण्याचे निर्देश मंत्रिमंडळाने दिले आहेत, असे वैष्णव यांनी सांगितले.

# एआयद्वारे नागरिककेंद्री प्रशासन व्यवस्था निर्माण करावी -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रशासनात आलेल्या तुकडीने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा उपयोग करत नागरिक केंद्रित व जबाबदार प्रशासन व्यवस्था निर्माण करावी, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. २०२४च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील आठ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी वर्षा निवासस्थानी संवाद साधला. या वेळी मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते.

संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी समाजातील शेवटच्या घटकाचे कल्याण हे ध्येय ठेवत त्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची ताकद प्रशासनात आहे. त्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेचा उपयोग करावा. राज्याच्या विकासगाथेला पुढे नेण्याची जबाबदारी सार्थपणे सांभाळण्याची अपेक्षा व्यक्त केली.

महाराष्ट्र हे सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे. राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी विकास केंद्रित प्रशासन गरजेचे आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांकडे नागरी प्रशासनात मोठ्या प्रमाणावर काम करण्याची संधी आहे.



महसूल सुधारणांसाठी सल्लागार नेमण्यापेक्षा प्रशासनातील दांडगा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा खूप चांगला परिणाम दिसून येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी या वेळी परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिचय करून घेतला. त्यांचा आतापर्यंतचा प्रवास, मागील अनुभव, महाराष्ट्रात काम करत असताना जाणवलेल्या चांगल्या बाबी, सुधारणा करणे गरजेचे असलेल्या बाबी याविषयीही विस्तृत संवाद साधला.

### विकासाची परिसंस्था अधिक बळकट होणार

दुर्गम, नक्षलग्रस्त असलेल्या गडचिरोलीची ओळख आता 'स्टील सिटी' म्हणून होत आहे. या जिल्ह्यात तीन लाख कोटींचे सामंजस्य करार उद्योगांसाठी करण्यात आले आहेत. समृद्धी महामार्गाने राज्याची राजधानी व उपराजधानी जोडली आहे. त्यामुळे गतीने दळणवळण यंत्रणा निर्माण झाली आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी शक्तीपीठ महामार्ग महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. टोयोटा किर्लोस्कर कंपनी छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रकल्प स्थापन करीत आहे. त्यामुळे या भागात विकासाची परिसंस्था अधिक बळकट होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## कर्नाळा बँकेतील ठेवींबाबत सहकार विभाग पुढाकार घेणार

### जप्त मालमत्ता, कायदेशीर प्रकरणांबाबत मुख्यमंत्र्यांकडे होणार बैठक



**मुंबई : प्रतिनिधी**

कर्नाळा नागरी सहकारी बँक लिमिटेडच्या ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत देण्यासाठी सहकार विभागाने पुढाकार घ्यावा. या बँकेच्या जप्त मालमत्ता, कायदेशीर प्रकरणे या संदर्भात मुख्यमंत्री यांच्याकडे बैठकीचे आयोजन केले जाईल, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले.

पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या मागणीनुसार सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या दालनात झालेल्या बैठकीच्या वेळी आमदार प्रवीण दरेकर, आमदार प्रशांत ठाकूर, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, सह सचिव संतोष पाटील आदी उपस्थित होते.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले, बँकेच्या ठेवीदारांना ठेवी परत देण्यासाठी बँकेच्या ज्या मालमत्तासंदर्भात न्यायालयीन प्रकरणे सुरू आहेत यासंदर्भातदेखील सहकार विभागाने आवश्यक तो पाठपुरावा करावा.

एमपीआयडी यांच्याकडील विषयासंदर्भात कायदेशीर सल्ला घेण्यात यावा, असेही ते म्हणाले.



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : भाजप कामगार आघाडी रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र घरत यांची कन्या आर्या घरत हिला एमबीबीएस वैद्यकीय शिक्षण एमजीएम महाविद्यालयात घेण्यासाठी पाच लाख रुपयांची मदत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून करण्यात आली आहे. हा धनादेश मंडळाचे संस्थापक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आर्याचे वडील जितेंद्र घरत यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. या वेळी जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव आदी उपस्थित होते.**

### उरण नगर परिषद निवडणूक

## भाजप महायुतीकडून उमेदवारांचे अर्ज आज होणार दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष महायुतीतर्फे उरण नगर परिषदेच्या निवडणुकीकरिता नगराध्यक्षपदाचे तसेच नगरसेवकपदाचे उमेदवार गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता आपले नामांकन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करणार आहेत.



या नामांकन दाखल सोहळ्यास रायगड जिल्ह्याचे संपर्क प्रमुख व महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, तसेच उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पक्ष अध्यक्ष अविनाश कोळी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून महायुतीचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

## खालापुरातील वारकऱ्याचा आळंदीत शॉक लागून मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

कार्तिकी एकादशीनिमित्त कामशेत येथे दिंडीत ट्रक घुसून झालेल्या अपघातात एका वारकरी महिलेचा मृत्यू झाला होता. त्या पाठोपाठ खालापूर तालुक्यातील वणवे गावचे रहिवासी हभप नितिन मोहन घोलप यांचा आळंदी येथे शॉक लागून मृत्यू झाला आहे.

मोहन घोलपहे त्यांचे गावातील भैरवनाथ मंदिरातील विद्युत रोषणाईचे काम आटोपून तीर्थक्षेत्र आळंदी येथे असलेल्या धर्मशाळेत विद्युत रोषणाईचे काम करत होते. या वेळी त्यांना वरून प्रवाहित असणाऱ्या एचटी लाईनचा धक्का बसला आणि ते उंचावरून खाली फेकले गेले. घोलप यांच्या डोक्याला जबर मार लागून त्यांचा जागीच मृत्यू झाला. हभप नितिन मोहन घोलप यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण वारकरी पंथावर शोककळा पसरली आहे.

## निवडक

### शिवसेनेच्या नाव, चिन्हाबाबत पुढच्या वर्षी होणार सुनावणी

**नवी दिल्ली :** शिवसेना नाव आणि पक्ष चिन्हाबाबत आज अंतिम सुनावणी होणार होती, मात्र कोर्टाने पुन्हा एकदा ही सुनावणी पुढे ढकलली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का मानला जातो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी कोर्टाचा निकाल यावा यासाठी ठाकरेंकडून प्रयत्न सुरू होते, मात्र आता या खटल्याची अंतिम सुनावणी थेट पुढच्या वर्षीच होणार आहे. २१ जानेवारी २०२६ रोजी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या नाव आणि चिन्हाबाबत अंतिम सुनावणी घेतली जाईल.

### ई-केवायसीत 'लाडक्या बहिणीं'च्या अडचणी होणार दूर

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्याचे आवाहन सरकारने केले आहे, मात्र ही केवायसी करताना अनेक अडचणी येत आहेत. ज्या महिलेला पती आणि वडील नाही त्यांना केवायसी करता येत नाहीये. हीच अडचण लक्षात घेऊन आता संकेतस्थळात महत्त्वाचे बदल केले जात आहे, अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

## दिल्ली स्फोट प्रकरणानंतर रायगडातील सागरी सुरक्षेवर भर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

दिल्ली स्फोट प्रकरणानंतर रायगड जिल्ह्याची सागरी सुरक्षा अधिक सक्षम करण्यावर जिल्हा पोलीस दलाने भर दिला आहे. समुद्र किनाऱ्यांबरोबरच फाऊस्टार हॉटेलसुद्धा सुरक्षा दृष्टीने महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे या ठिकाणची सुरक्षा तपासून समुद्र किनाऱ्यांवरील एक हजाराहून अधिक कॉटेजेस आणि हॉटेल्सची तपासणी करण्यात आली आहे. तसेच किनाऱ्यांवर सर्चिंग ऑपरेशन सुरू आहे.

दहशतवाद्यांचे मनसूबे उधळून लावण्यासाठी रायगड जिल्ह्यातील सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आहे. पेण, अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धन तालुक्यांमधील कोस्टल आणि लँडींग भागात शस्त्रधारी नाकाबंदी करण्यात आली आहे. काही ठिकाणी स्पेशल ऑल आऊट ऑपरेशनदेखील राबविण्यात आले आहेत.

मच्छीमारांसोबत संवाद साधून त्यांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सागर सुरक्षा



दल, ग्राम सुरक्षा दल आणि पोलीस पाटील यांच्या बैठकीद्वारे जनजागृती करण्याचे काम सुरू आहे. तालुक्यातील आर्थिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा समजला जाणारा ताज हॉटेल येणाऱ्यांची माहिती नोंदवून ठेवण्यात येत आहे. समुद्र किनाऱ्यांवर पोलीसांची सतत गस्त सुरू आहे.

सोशल मीडियावर अफवा पसरवण्याचा प्रकार काही संघटनांकडून होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सोशल मीडिया सेल सक्रिय आहे. सायबर सेल प्रत्येकाच्या हालचालींवर लक्ष ठेवणार आहे आणि ही यंत्रणा २४ तास सुरू राहणार आहे.

> ***सुरक्षेच्या दृष्टीने जिल्ह्यात पर्यटनासाठी येणाऱ्या सर्व वाहनांची तपासणी केली जात आहे. किनाऱ्यांवर दररोज पायी पेट्रोलिंग केल्या जात असून, मुंबईहून मांडवा येथे बोटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचीदेखील तपासणी होत आहे. महत्त्वाच्या ठिकाणी पोलिसांची २४ तास गस्ती सुरू आहेत.***
>
> ***-आंचल दलाल, जिल्हा पोलीस अधीक्षक***

रायगड जिल्ह्यातील सागरी सुरक्षा मजबूत ठेवण्यासाठी सुरक्षा यंत्रणा सतत काम करत आहे. जे कर्मचारी दीर्घकालीन सुट्टीवर आहेत, त्यांना पुन्हा बोलावण्यात आले आहे. पोलीस दलाकडे चार बोटी असून मच्छीमारांच्या बोटींच्या सहाय्याने सागरी किनाऱ्यांवरील संशयित हालचालींवर लक्ष ठेवले जात आहे.

## पंतप्रधान मोदींनी घेतली दिल्ली स्फोटातील जखमींची भेट

### षडयंत्र रचणाऱ्यांना दिला मोठा इशारा





**दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली बॉम्बस्फोटातील जखमींची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भेट घेतली आहे. भूतानवरून परताच नरेंद्र मोदी रुग्णालयात जखमींच्या भेटीसाठी दाखल झाले. त्यानंतर सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत त्यांनी षडयंत्र रचणाऱ्यांविरोधात इशारा दिला आहे.

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटातील जखमींना भेटण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकनायक रुग्णालयाला भेट दिली. भूतान दौऱ्यावरून परतल्यानंतर लगेचच त्यांनी ही भेट दिली. या भेटीमुळे रुग्णालयाबाहेर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. या भेटीची माहिती त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर दिली आहे. दिल्लीतील स्फोटात जखमींची एलएनजेपी रुग्णालयात जाऊन भेट घेतली. सर्व लवकर बरे होण्याची प्रार्थना. षडयंत्र रचणाऱ्यांना शिक्षा होईल असा इशाराही दिला आहे. सर्व जखमींना याच रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सोमवारी संध्याकाळी ६.५० वाजता पांढऱ्या ह्युंदाई आय२० कारमध्ये हा स्फोट झाला. लाल किल्ल्याजवळ झालेल्या या स्फोटात आतापर्यंत नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. गर्दीच्या वेळी झालेल्या या घटनेत अनेक गाड्या जळून खाक झाल्या आणि २० जण जखमी झाले.

## तोंडरे गावात रस्ते काँक्रीटीकरण आणि गटारांच्या कामाचे भूमिपूजन

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील तोंडरे गावात आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने रस्त्याचे काँक्रीटीकरण आणि गटारांचे काम सुमारे १६ कोटी रुपयांच्या निधीमधून करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि.१२) झाले.

पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विकासाची कामे मार्गी लागत आहे. त्यानुसार १६ कोटी २८ लाख ९९ हजार ७५१ रुपयांच्या निधीमधून तोंडरे गावातील पाण्याच्या टाकीपासून ते हनुमान मंदिर पर्यंत पावसाळी गटार बांधकाम आणि रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या वेळी भाजप नेते राम पाटील, नारायण शेट पाटील, एकनाथ देशेकर, भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, महेश पाटील, वासुदेव पाटील **(पान २ वर..)**

## दिल्ली स्फोटप्रकरणी तपास यंत्रणांचे देशभरात छापे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली स्फोट प्रकरणाचा तपास वेगानं सुरू आहे. राष्ट्रीय तपास संस्था - एनआयए आणि सुरक्षा यंत्रणांनी राष्ट्रीय राजधानी क्षेत्र तसंच जम्मू-काश्मीरमधल्या पुलवामा आणि कुलगामसह अनेक ठिकाणी मोठी कारवाई केली. या छाप्यात मोठ्या प्रमाणात स्फोटकं जप्त करण्यात आली असून, श्रीनगरमधला डॉक्टर तजामुल मलिक याला ताब्यात घेण्यात आले आहे.

कुलगाममध्ये प्रतिबंधित संघटना जमात-ए-इस्लामी या संघटनेच्या ठिकाणांवर छापा टाकण्यात आला. या स्फोटात वापरण्यात आलेली कार गेल्या १० ते १२ दिवसांपासून फरिदाबादच्या अल-फलाह विद्यापीठाच्या पार्किंगमध्ये उभी होती, असं चौकशीदरम्यान समोर आलं आहे.

दरम्यान, महाराष्ट्र एटीएस दहशतवादविरोधी पथकाने मुंब्रा इथून एका संशयिताला अटक केली आहे. त्याच्या घरातून अनेक इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. जप्त केलेल्या वस्तूंचा तपास केला जात असल्याचे एटीएसने सांगितले.

## पनवेलमध्ये उद्या सरदार @१५० युनिटी मार्च पदयात्रा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत माय भारत केंद्र रायगड, पनवेल महानगरपालिका, जिल्हा प्रशासन रायगड, राष्ट्रीय सेवा योजना आणि स्थानिक सीकेटी महाविद्यालय पनवेल ह्यांचे संयुक्त विद्यमाने सरदार @१५० युनिटी मार्च आणि विकसित भारत पदयात्रा या उपक्रमाचे आयोजन १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत पनवेल येथील वडाळे तलाव करण्यात आले आहे.

या पदयात्रेद्वारे तरुणांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण राष्ट्राच्या ऐक्य, अखंडता आणि देशभक्तीच्या भावनांना पुनरुज्जीवित करतील. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या एकसंध भारताच्या विचारांना स्मरून एकात्म भारताच्या निर्मितीचा संकल्प या माध्यमातून घेतला जाणार आहे. सर्व नागरिकांनी या ऐतिहासिक पदयात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे व रायगड जिल्हा युवा अधिकारी अमित पुंडे यांनी केले आहे.

**असा असेल मार्ग**
***वडाळे तलाव - गावदेवी मंदिर - छत्रपती शिवाजी चौक - कर्मवीर भाऊराव पाटील चौक - पनवेल महापालिका मुख्यालय - वडाळे तलाव.***

६ ऑक्टोबर २०२५ रोजी भारत सरकारने माय भारत पोर्टलवरून सरदार@१५० युनिटी मार्च या डिजिटल मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमात सोशल मीडिया रील स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा आणि सरदार@१५० यंग लीडर्स प्रोग्रामचा समावेश आहे. **(पान २ वर..)**

# ‘एआय’च्या वापरामुळे पत्रकारिता अधिक प्रभावी’

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) साधनांचा योग्य वापर केल्यास बातमी लेखन, संशोधन आणि विश्लेषण अधिक प्रभावी करता येते, असे मत ‘एआय’ तज्ज्ञ किशोर जस्मानी यांनी केले.रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालय येथे प्रिंट आणि डिजिटल मीडिया पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासंदर्भात प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले, त्यावेळी जस्मानी यांनी मत व्यक्त केले.



‘एआय’ तज्ज्ञ किशोर जस्मानी म्हणाले की, ओपन एआय, जेमिनी आणि को–पायलट ही तीन प्रमुख एआय टूल्स पत्रकारांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. तसेच क्लॉड, डीपसिक आणि परप्लेक्सिटी ही आणखी तीन प्रभावी टूल्स आहेत. प्रत्येक टूल्सचा वापर आवश्यकतेनुसार आणि उद्दिष्टानुसार करावा. जेमिनी संशोधनासाठी विशेषतः उपयुक्त आहे, तर डीपसिक उत्तरे देण्यात अधिक प्रभावी ठरते. मात्र, मेटा एआय हे पत्रकारितेसाठी तेवढे परिणामकारक नाही, असे त्यांनी नमूद केले.

किशार जस्मानी यांनी स्पष्ट केले की, बिंग, को–पायलट, गूगल बार्ड, जेमिनी आणि परप्लेक्सिटी ही साधने संशोधनासाठी, तर चॅटजीपीटी, गूगल बार्ड आणि जेमिनी ही प्रभावी लिखाणासाठी उपयुक्त आहेत. ही टूल्स समस्या सोडविणे आणि सल्ला देणे यासाठीही पत्रकारांना मदत करू शकतात.प्रत्येक ‘एआय’ टूल्सचा परिणाम ज्ञान, प्रॉम्प्टिंग कौशल्य आणि तर्कशक्ती या तीन घटकांवर अवलंबून असतो. प्रॉम्प्टिंगचे तीन प्रकार, शून्य शॉट, संदर्भाधारित आणि भूमिकाधारित यांचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले. तसेच पत्रकारितेतील लेखन अधिक परिणामकारक करण्यासाठी ग्रामर्ली हे अ‍ॅपही उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले.

किशोर जस्मानी यांनी चॅटजीपीटी या साधनाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकही दाखविले. त्यांनी सांगितले की, फोटो आणि योग्य प्रॉम्प्ट दिल्यानंतर चॅटजीपीटी त्या आधारे वृत्तपत्रीय बातमी तयार करून देते. मात्र यासाठी योग्य प्रॉम्प्ट देणे अत्यावश्यक आहे.त्याचप्रमाणे चॅटजीपीटीवर आवाज रेकॉर्ड करून हवे त्या भाषेत लेखन करून घेता येते, तसेच व्हॉईस डिक्टेटद्वारेही हे टूल्स पत्रकारांना सहाय्य करते. या प्रक्रियेतून त्यांनी प्रॉम्प्ट, डिक्टेट आणि डिस्कशन अशा तीन प्रकारची प्रात्यक्षिके करून दाखविली.

‘एआय’ टूल्स हस्तलिखित प्रतीवरून स्वयंचलितपणे टंकलेखन करू शकतात. पीडीएफ स्वरूपातील मजकूर चॅटजीपीटीच्या मदतीने कसा उपयोगात आणता येऊ शकतो, याचे सविस्तर मार्गदर्शनही त्यांनी केले.या प्रशिक्षण सत्रात उपस्थित पत्रकारांनी ‘एआय’ साधनांचा वापर करून प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे सराव केला आणि संवादात्मक पद्धतीने मार्गदर्शन घेतले.

# शाळकरी मुलीच्या हाती रिक्षाचे स्टेअरिंग

## खालापुरात धक्कादायक प्रकार



**खोपोली : प्रतिनिधी**

विद्यार्थी वाहक रिक्षा चालकाने राष्ट्रीय महामार्गावर रिक्षाचे स्टेअरिंग चक्क शाळकरी मुलीच्या हातात दिल्याचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल होत असून पोलिसांनी या रिक्षाचालकावर कारवाई केली आहे.

महामार्गावर वाढते अपघात याबद्दल सर्वत्र जागरूकता , कडक नियमांची अंमलबजावणी होत असताना खालापुरात मात्र नियमाला हरताळ फासली जात आहे. खोपोली येथील शाळेत विद्यार्थिनींना घेऊन जाणाऱ्या रिक्षा चालकाने मुंबई पुणे महामार्गावर मुलीची हौस पूर्ण करण्या करिता स्टेअरिंग चक्क तिच्या हातात दिले. यावेळी रिक्षा चालक त्या मुलीच्या बाजूला निवांत बसल्याचे चित्रीकरण दुचाकीवरून जाणाऱ्या जागरूक नागरिकांनी केले .रिक्षामध्ये पाठीमागे बसलेल्या शाळकरी मुलींपैकी काहींच्या चेहऱ्यावर भीती दिसल्याने दुचाकी चालकाने मोबाईल मध्ये चित्रीकरण करून समाज माध्यमावर व्हायरल केले. खोपोली पोलिसांनी संबंधित रिक्षा चालकावर कारवाई केली आहे.

# ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर दृष्टीबाधित विद्यार्थ्यांची सफर

**मुरुड : प्रतिनिधी**

प्रतिवर्षा प्रमाणे १४ व्या वर्षी जिजाऊ प्रतिष्ठान आणि नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग /दृष्टबाधित विद्यार्थ्यांसाठी सालाबादाप्रमाणे गिरीदुर्गावर दुर्ग दर्शन मोहिम यावर्षी जलदुर्ग जंजिरा किल्ल्यावर दि. ८ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आली .नॅबचे २९ विद्यार्थी आणि ४ शिक्षिकांनी यात सहभाग घेतला. जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक चंद्रकांतसाटम यांच्या नेतृत्वाखाली २९ स्वयंसेवकांच्या देखरेखीखाली ही मोहीम यशस्वी झाली.



दहिसर वरून प्रस्थान करून शनिवार सकाळी एकदरा येथील सम्राट हॉटेल या ठिकाणी हे सगळे विद्यार्थी आणि जिजाऊ प्रतिष्ठानचे स्वयंसेवक समूह एकत्रित जमले. चहा नाश्ता झाल्यानंतर हया चमूने जंजिऱ्या कडे प्रस्थान केले .या विशिष्ट मुलांच्या मोहिमेची माहिती जंजिरा किल्ल्यातील केंद्र पुरातत्व विभागाचे अधिकारी सहाय्यक संवर्धक बी .जी येलीकर यांच्या मार्गदर्शना खाली बहुउद्देशीय कर्मचारी प्रकाश घुगरे आणि कर्मचाऱ्यांचे मोहिमेतील सहभागी विद्यार्थ्यांना विशेष सहकार्य लाभले .

या मोहिमेत मुलांना शिडाच्या हेलकावणाऱ्या बोटीत चढवणे आणि किल्ल्यावरील प्रवेशद्वारात उतरवणे हे काम जिकरीचे होते .ते आव्हानही सर्वांनी योग्य प्रकारे स्वीकारले . किल्ल्याचा महादरवाजा वरील लोखंडी कडी, टोकदार खिळे आपल्या हस्तस्पर्शाने पाहून दुर्ग भ्रमंती ला प्रारंभ झाला .पुढे जंजिऱ्याला अजिंक्य ठेवणाऱ्या महाकाय पंचधातुने मढविलेल्या तोफानां हस्तस्पर्श करीतआगळी वेगळी अनुभूती घेतली . या अजिंक्य किल्ल्याचा रंजक इतिहास श्रवण करण्यात विद्यार्थी दंग झाले होते .

प्रा . डॉ. मृण्मयी साटम यांनी ऐतिहासिकदस्ताऐवजांचासंदर्भ देत किल्ल्याच्या गत स्मृतींना उजाळा दिला.या विद्यार्थ्यांनी किल्ल्याच्या दुर्ग अवशेष हे आपल्याला सोबतच्या स्वयंसेवकांच्या डोळ्यांनी न्याहळत किल्ल्याच्या तटबंदी वरील मार्गावरूनकिल्याची प्रदक्षिणा पूर्ण केली.परतीचा प्रवासात दुपारी पुन्हा मुलांना जंजिऱ्याच्या महादरवाज्यातील पायऱ्यांच्या जवळ हेलकावणाऱ्या होडीत सुरक्षित पणे चढवून छत्रपती शिवाजी महाराजांच्याजयघोषाने सर्वांनी जंजिरा किल्ल्याचा निरोप घेतला. जाता जाता घोंगवणारा वारा, समुद्राची गाज ऐकत ही सर्व मंडळी दंडा राजपूरीच्या किनाऱ्यावर उतरली.सम्राट हॉटेल मालकांनी केलेल्या सुग्रास भोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला .

स्वयंसेवकांनी खूप चांगल्या प्रकारे काळजी घेतली. इतिहास हा प्रेरणादायी होताशिडाच्या होडीतील प्रवास थोडा भीतीदायक पण तितकाच आनंददायी होता.अशा प्रतिक्रिया विद्यार्थ्यांसह शिक्षक वृंदानी दिल्या .

जिजाऊ प्रतिष्ठान दहिसरचे संस्थापकचंद्रकांत साटम यांनी मोहिमेत सहभागी आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले. जंजिऱ्याच्या ज्या ज्या वास्तूंनी हा विद्यार्थ्यांचा स्पर्श अनुभवला त्या वास्तू हा स्पर्श निरंतर आपल्या हृदयात जपून ठेवतील यात शंका नाही.

# ‘सोशल मीडियाचा अतिवापर ठरतोय वैवाहिक नात्याचा शत्रू’



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही वर्षांत घटस्फोटांचे प्रमाण झपाट्याने वाढले असून सुमारे ५० टक्के प्रकरणांमागे विवाहबाह्य संबंध हे प्रमुख कारण असल्याचे खाजगी गुप्तहेर प्रिया काकडे यांनी मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. नोकरीचा ताण, भावनिक दुरावा आणि सोशल मीडियाचा अतिवापर यामुळे पती–पत्नींमध्ये अंतर वाढत आहे आणि या दुराव्यामुळे संशय व फसवणुकीच्या घटनांत वाढ होत आहे.

काकडे यांच्या मते, संशयावर नव्हे तर ठोस पुराव्यांवर निर्णय घेण्यासाठी जोडपी आता खाजगी डिटेक्टिव्ह एजन्सींकडे वळत आहेत. त्यांच्या स्विफ्ट डिटेक्टिव्ह अँड इन्व्हेस्टिगेशन या एजन्सीने २००६ पासून १०८९ पेक्षा अधिक वैवाहिक व कॉर्पोरेट प्रकरणे यशस्वीपणे हाताळली आहेत.

त्यांनी सांगितले की उच्चशिक्षित आणि श्रीमंत वर्गातही विवाहबाह्य संबंधांचे प्रमाण वाढले आहे. आयटी, बँकिंग आणि वैद्यकीय क्षेत्रातील दांपत्यांमध्ये हा कल विशेषतः दिसून येतो. नोकरीचा ताण, वेळेअभावी संवाद कमी होणे आणि सोशल मीडियावर वाढती भावनिक गुंतवणूक यामुळे विवाहबाह्य नात्यांची शक्यता अधिक वाढली आहे असे काकडे यांनी सांगितले

# विहुले ग्रामस्थांचा भाजपमध्ये प्रवेश



**माणगाव : प्रतिनिधी**

साई पंचायत समिती गणातील विहुले गावातील काही ग्रामस्थांनी भाजपामध्ये पक्षप्रवेश केल्यानंतर उर्वरित ग्रामस्थांनी देखील विकासाच्या वाटेवर जाण्याचे निश्चित करून प्रदेशाध्यक्ष मा.रवींद्र चव्हाण साहेब,खासदार तथा जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा पाटील,आमदार प्रशांतदादा ठाकूर,आमदार रवीशेठ पाटील,लोकसभा प्रमुख सतीशजी धारप साहेब,माजी राजीप अध्यक्ष आस्वादशेठ पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन संपूर्ण गावाने एकमुखी निर्णय घेऊन विद्यमान ग्रामपंचायत सदस्य समीरजी महाडिक यांच्यासमवेत गावचे अध्यक्ष व गावाकमिटी,मुंबईकर मंडळाचे अध्यक्ष व कमिटी आणि ग्रामस्थ यांनी भाजपामध्ये जाहीर पक्षप्रवेश केला,

यावेळी प्रमोद गणपत महाडीक अध्यक्ष, विहुले उत्कर्ष मंडळ मुंबई श्री.चंद्रकांत बालाजी कठे उपाध्यक्ष,विहुले उत्कर्ष मंडळ मुंबई श्री. गजानन विठोबा दळवी सचिव, विहुले उत्कर्ष मंडळ मुंबई श्री. विजय शंकर महाडीक,अध्यक्ष, ग्रामस्थ मंडळ विहुले,श्री. समिर सुभाष महाडीक,सचिव,ग्रामस्थ मंडळ तथा सदस्य,ग्रामपंचायत विहुले,श्री. विश्वास केशव महाडीक,ग्रामस्थ,श्री.प्रशांत पंढरीनाथ महाडीक ग्रामस्थ,श्री.अरविंद मोतीराम दळवी ग्रामस्थ,श्री. सुभाष तुकाराम दळवी ग्रामस्थ,श्री.मधुकर दामोदर महाडीक यांनी जाहीर पक्षप्रवेश केला.

यावेळी माणगाव तालुकाध्यक्ष परेश सांगले,उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर,साई विभाग उपाध्यक्ष निलेश दळवी,जनार्दन महाडिक उपस्थित होते.या पक्षप्रवेशामुळे संघटनेला साई विभागात अधिक बळकटी मिळाली असून गावच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपा कटीबद्ध असल्याचे विभागीय उपाध्यक्ष निलेश दळवी यांनी सांगितले.

# खोपोली–पेण मार्गावर दुचाकी अपघातात एक ठार, एक जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

वावोशी पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोटारसायकल अपघातात एक जण ठार तर दुसरा गंभीर जखमी झाला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी जखमींना उपचारासाठी पेण येथील खाजगी रुग्णालयात घेऊन जात असताना उपचारापूर्वीच एकाचा मृत्यू झाला.

कौशल म्हात्रे गड्थ कंपनी पाली फाटा येथील कंपनीतून पेण येथे घरी जाताना अज्ञात वाहन आणि मोटारसायकलचा अपघात झाला.दुसऱ्या जखमी युवकाचे नाव संकेत कृष्णा माळवी असे असून तो अलिबागचा रहिवासी आहे.

# महागाव नदीवरील पुलाची उंची वाढविण्याची मागणी

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्याचा महागाव हा विभाग महत्वाचा असून या विभागातील गावांना जोडणारा तळा –सालशेत – विनवली महागाव कोरखंडे बारपे या रस्त्यावरती महागाव गावाजवळ असणाऱ्या पुलाची उंची वाढविण्याची मागणी प्रवासी व महामार्गावरील नागरिकांतून केली जात आहे.



तळा ते महागाव बारपे मार्गावरती बहुलेवाडी , महागाव, बारपे,कोरखंडे, म्हसाडी व आदिवासी वाड्या अशी अनेक गावे आहेत. या मार्गावर महागावजवळून असणाऱ्या नदीवरती पुल असून या पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात मुसळधार पाऊस पडला की या पुलावर पाणी येत असते पाणी आले की या पुलावरून काही काळ वहातूक बंद होते.पर्यायाने वहतुककोंडी होण्यास सुरुवात होते. या पुलावरून तळा,रोहा, माणगाव कडे जाता येते.त्यामुळे नेहमीच महामार्गावर वाहतूक चालू असते. अनेक नागरिक या मार्गावरून प्रवास करत असल्याने या पुलाची उंची वाढवावी व कठडे बसवावेत अशा मागणीला प्रवासी, विद्यार्थी ,वाहनचालक व नागरिकांतून आहे.

पान १ वरुन

## तोंडरे गावात रस्ते कॉंक्रीटीकरण आणि गटारांच्या कामाचे भूमिपूजन

अशोक पाटील, विनोद पाटील, संतोष भोईर, अशोक साळुंखे, अंकुश पाटील, कैलास मढवी, परेश पाटील, नितेश पाटील, युवा मोर्च्या तालुका सरचिटणीस विश्वजित पाटील, बच्चू काठे, माणिक काठे, अरुण पाटील, धनाजी पाटील, वतन पाटील, नितीन पाटील, अनमोल पाटील, वसंत पाटील, बळीराम पाटील, सुभाष पाटील, रोहिदास पाटील, लक्ष्मण पाटील, दत्ता बुवा पाटील, शिवराम पाटील, आत्माराम पाटील, बामा पाटील, सुभाष पाटील, वसंत पाटील, आशीर्वाद पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## पनवेलमध्ये उद्या सरदार @१५० युनिटी मार्च पदयात्रा

या प्रोग्राममधील १५० विजेत्यांना राष्ट्रीय पदयात्रेत सहभागी होण्याची संधी दिली जाणार आहे.

१. जिल्हा स्तरावरील पदयात्रा (८ ते १० कि.मी.): या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्यात ६ ते ८ कि.मी. लांबीची पदयात्रा काढली जाईल. शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध,वादविवाद, परिसंवाद, पथनाट्य आदी उपक्रम, नशामुक्त भारत व ‘अभिमानाने स्वदेशी’ अशा प्रतिज्ञा अभियानासह योग, आरोग्य व स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात येणार आहे. पदयात्रेदरम्यान सरदार पटेल यांच्या प्रतिमेस अभिवादन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि प्रमाणपत्र वितरण केले जाईल.

२. राष्ट्रीय पदयात्रा (२६ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२५): या उपक्रमातील दुसऱ्या टप्प्यात करमसद (पटेल यांचे जन्मस्थान) ते केवडिया (स्टॅच्यू ऑफ युनिटी) असा १५२ कि.मी. प्रवास होईल. मार्गावरील गावांमध्ये सामाजिक विकास उपक्रम, ‘डेव्हलपिंग इंडिया प्रदर्शन’ आणि ‘सरदार गाथा’ सादर केली जाईल.

**नोंदणी आणि सहभाग**

देशभरातील तरुणांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून एक भारत, श्रेष्ठ भारत या संकल्पनेला प्रत्यक्षात आणावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी भारत पोर्टलवर https://mybharat.gov.in/pages/unityšmarch नोंदणी सुरू आहेत.



# प्रगतीसाठी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे –अच्युत गोडबोले

**मुंबई: रामप्रहर वृत्त**

आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे जगात अमुलाग्र बदल होत आहे. या बदलांना आत्मसात केले तरच प्रगती शक्य आहे, असे मत प्रख्यात लेखक श्री. अच्युत गोडबोले यांनी व्यक्त केले.



महावितरणच्या येथील सांघिक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मंगळवारी (दि. ११) माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुलात कौटुंबिक स्नेह मेळावा उत्साहात झाला. यावेळी मुख्य व्याख्याते म्हणून गोडबोले बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून महावितरणचे संचालक श्री. सचिन तालेवार (संचालन), श्री. अनुदीप दिघे (वित्त) व श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) आणि कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर, श्री. परेश भागवत, श्री. दत्तात्रय पडळकर, स्वाती व्यवहारे, अपर्णा गिते उपस्थित होते.

या कार्यक्रमात ’दैनंदिन कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर’ या विषयावर अच्युत गोडबोले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्तेने आपले आसपासचे सर्व क्षेत्र व्यापले आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाची माहिती घेऊन त्याचा प्रभावी वापर केल्यास सर्वच क्षेत्रात यश मिळू शकते, असे गोडबोले म्हणाले.

नवतंत्रज्ञानाची माहिती महावितरणचे अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांना मिळावी तसेच कौटुंबिक स्नेहमेळाव्यातून परसस्परातील स्नेहभाव वृद्धींगत व्हावा या उद्देशाने कौटुंबिक स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी दिली. या स्नेह मेळाव्यातून अधिकारी व कर्मचाऱ्यांना नवीन ऊर्जा मिळेल असे प्रतिपादन संचालक श्री. अनुदिप दिघे यांनी केले. दुपारच्या सत्रात सादर झालेल्या ’रंगी रंगला महाराष्ट्र’ पारंपरिक नृत्यांनी बहरलेल्या संगीतमय कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाला महावितरणच्या सांघिक कार्यालयातील अभियंता, अधिकारी कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येत उपस्थित होते. महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कौटुंबिक धमाल केली. लहान मुले, महिला व पुरुषांच्या गटातील विविध खेळ, अधिकारी व कर्मचारी यांच्यात आपुलकीची चर्चा, व्याख्याने तसेच पारंपरिक नृत्यांचा संगीतमय कार्यक्रम आदींनी कौटुंबिक स्नेहमेळावा उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पाटणी यांनी केले.

## निवडक

### घरातून १६ लाखांची चोरी



**पनवेल :** घरात कोणी नसताना दरवाज्याचा कडी-कोईडा तोडून आत कपाटामध्ये ठेवलेले दागिने व रोख रक्कम असा एकूण सुमारे १६ लाख रुपये किमतीची ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पनवेल शहरात भरदिवसा घडली आहे. पनवेल शहरातील महात्मा फुले रोड येथील श्री स्वामी समर्थ सोसायटी येथे राहणारे चैतन्य काळे यांचे घराचे दरवाजे बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने दरवाज्याचा कडी-कोईडा तोडून आत कपाटामध्ये ठेवलेले १५ लाख ३५ हजार रुपये किमतीचे दागिने व ६० हजार रोख रक्कम अज्ञात चोरट्याने चोरून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ट्रेलरचालकाची हाईटगेजला धडक

**पनवेल :** पनवेल-जेएनपीटी हायवे रोडवर ट्रेलरचालकाने निष्काळजीपणाने ट्रेलर चालवुन रोडवर असलेल्या हाईटगेजला ठोकर दिली. याघटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. ट्रेलरचालक विनोदकुमार यादव (वय ४० वर्षे) याने त्याच्या ताब्यातील ट्रेलर रस्त्याच्या परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे, निष्काळजीपणाने चालवुन रोडवर असलेल्या हाईटगेजला ठोकर दिली. यामध्ये हाईटगेजचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ट्रेलरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास पोलीस हवालदार जितीन खरात करत आहेत.

### दुकानातून रोकड लंपास

**पनवेल :** हॉटेलच्या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने गल्ल्यातील ७० हजार रुपये चोरून नेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लवेश सोनवणे यांचा प्रजापती आर्केड, से-१५, नवीन पनवेल येथे कॅफे लविस्ता हॉटेल आहे. नेहमीप्रमाणे कामगार हॉटेल उघडण्यासाठी आला असता, त्याला शटर उचकटले असल्याचे दिसून आले. यावेळी सोनवणे यांनी हॉटेलमध्ये पाहिले असता, गल्ल्यातील ७० हजार रूपयांची रोकड लंपास असल्याची बाबत उघडकीस आली.

# उद्यमशिलतेतून महिलांनी सक्षम व्हावे -जिल्हाधिकारी जावळे

**रायगड : रामप्रहर वृत्त**

उद्यमशिलतेतून सक्षम व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) अहमदाबाद उदया प्रकल्प कार्यालय अलिबाग व टाटा कम्युनिकेशन्स मुंबई पुरस्कृत नावडे पनवेल को ऑफ इंडस्ट्रीज सभागृह पनवेल येथे (दि.११ नोव्हेंबर) रोजी आयोजित महिलांकरीता उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमात केले.



या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पनवेल तहसीलदार मिनल भांबरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळया, रायगड जिल्हा बँक तळोजाचे व्यवस्थापक नितेश तोंडसे, उद्योजक विजय लोखंडे, उद्योजक लक्ष्मण जाधव सामाजिक कार्यकर्त्या व उद्योजिका श्रीमती राजश्री पाटील उपस्थित होते.

भारतीय उद्योजकता विकास संस्था (ईडीआय) व टाटा कम्युनिकेशन्सच्या सामाजिक दायीत्व विभागाकडून पुरस्कृत उदया प्रकल्पांतर्गत दोन आठवडे कालावधीचे महिला व दिव्यांगांकरीता उद्योजकता विकास कार्यक्रम घेण्यात आला होता. कार्यक्रमात सर्व प्रथम ईडीआयचे प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात येवून नावडे येथील महिला प्रशिक्षणार्थींनी सुरू केलेल्या माऊली भाकरी सेंटरचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाकरीता रायगड जिल्हा बँकेचे व जिल्हा उद्योग केंद्राचे मोलाचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन ईडीआय अलिबाग प्रकल्प अधिकारी शशिकांत दनोरीकर यांनी केले. या कार्यक्रमाला महिला प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## तळोजा फेज १ मधील रस्ते दुरूस्तीच्या कामांना वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खारघर प्रभागातील तळोजा पाचनंदमधील तळोजा फेज १ सेक्टर १० मधील खराब झालेल्या रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामांना वेग आला आहे.

सध्या पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील खराब झालेल्या रस्त्यांची दुरूस्ती मोठ्या प्रमाणात सुरू आहे. तळोजा पाचनंदमधील तळोजा फेज १ सेक्टर १० मधील खराब झालेल्या रस्त्याच्या दुरूस्तीची कामे वेगाने केली जात आहे.



अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ते दुरूस्तीसाठी महापालिकेच्या बांधकाम विभागतील कनिष्ठ अभियंताचा स्वतंत्र कक्ष तयार करण्यात आला आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये, खराब रस्त्यांबाबत तक्रारी दाखल करण्यासाठी विभागनिहाय कनिष्ठ अभियंत्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली कनिष्ठ अभियंता त्या त्या प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने करण्यात येत आहे.

## मानसरोवर रेल्वे स्थानकातील शौचालय दुरुस्तीसाठी भाजपचा पुढाकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे परिसरातील नागरिकांनी मानसरोवर रेल्वे स्थानकातील शौचालयाच्या अत्यंत दुरवस्थेचा व्हिडिओ सामाजिक माध्यमांवर शेअर करत तक्रार नोंदविल्यानंतर, कामोठ्यातील भाजप पदाधिकाऱ्यांनी तत्काळ याठिकाणी पाहणी केली.



भाजप कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत यांच्या उपस्थितीत स्टेशन मॅनेजर यांची भेट घेऊन शौचालयाची अत्यंत वाईट अवस्था, पाण्याचा अभाव, तुटलेले नळ आणि तीव्र दुर्गंधी याबाबत जाब विचारला. प्रवाशांना होणाऱ्या या गंभीर त्रासाबाबत स्टेशन प्रशासन आणि कॉन्ट्रॅक्टर यांना तातडीने दुरुस्तीचे निर्देश देण्यात आले असून, दोन दिवसांच्या आत शौचालय दुरुस्त करण्याचा आदेश देण्यात आला आहे. भाजप मंडळाने संबंधित अधिकाऱ्यांशी फोनवर संपर्क साधून परिस्थिती त्वरित सुधारण्याच्या सूचना दिल्या.

नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत हा प्रश्न गांभीर्याने घेत भाजपने ठाम भूमिका घेतली असून, स्टेशन प्रशासनाने शौचालय लवकरच कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले आहे. नागरिकांनी भाजप पदाधिकाऱ्यांना धन्यवाद दिले आहेत.



**पनवेल : मोहो ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच प्रवीण म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते यतिन पाटील, सतीष मालुसरे, गुरुनाथ भोईर, नितीन मोरे, महेंद्र भोईर, अंकुश शेळके आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांची कन्या वैष्णवी कडू हिने फ्लोरिडा येथील मायामी एव्हिएशन संस्थेत कमर्शियल पायलटची ट्रेनिंग पूर्ण करून ती कमर्शियल पायलट बनली आहे. याबद्दल तिचे माजी नगरसेविका दर्शना भोईर, कविता ठाकूर, सपना पाटील, कविता पाटील, सुजाता दीदी आदींनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## रस्त्यांबाबत भाजप नेते केदार भगत यांचे पनवेल पालिकेला पत्र

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील रस्त्यांबाबत आणि काही गतिरोधक बसविण्याबाबत भाजपचे शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी पालिकेकडे पत्रव्यवहार केला असून पालिकेकडून देखील लवकरच कार्यवाही होणार असल्याचे त्यांना सांगितले आहे.

हुतात्मा हिरवे गुरूजी मार्ग म्हणजे जुने आदर्श हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा हा मार्ग खड्ड्यांनी व्यापला आहे. हीच परिस्थिती कापड गल्ली, स्वामी हॉटेल ते गावदेवी मंदिर, तक्का येथील पेट्रोल पंप जवळदेखील आहे. हे सर्व रस्ते शहरातील मुख्य रस्ते आहेत खड्ड्यातून मार्गक्रमण करताना नागरिकांना विशेषकरून वाहनचालकांना जिकिरीचे झाले आहे. पावसामुळे काही महिने नागरिकांनी रस्त्यामुळे होणार हाल सोसले आहेत. पण आता पावसाचे प्रमाण नगण्य झाले आहे. त्यामुळे आता तातडीने नागरिकांना खड्डेमुक्त आणि धूळमुक्त रस्ते हवे आहेत. त्यामुळे याबाबत गांभीर्यपूर्वक विचार करून रस्त्यांची डागडुजी आणि शक्य असेल तिथे नवीन रस्ते करावेत.तसेच शहरातील मुख्य मार्केट (हनुमान मंदिर) ते उरण नाका रस्ता आमच्या परिसरातून जातो आणि त्या रस्त्यावर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात आहे. व येथील रहिवाश्यांना त्रास होत आहे.

अनेक वाहनचालक येथे अतिवेगाने वाहने चालवतात. त्यामुळे अपघात होण्याचा धोका वाढला असून, शाळकरी मुले, वृद्ध व्यक्ती आणि पादचारी यांना रस्ता ओलांडताना अडचण निर्माण होते. संबंधित ठिकाणी स्पीडब्रेकर (गतिरोधक) बसविण्यात यावेत अशा आशयाचे पत्र भाजपचे शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी पालिकेच्या आयुक्तांना दिले आले.

## पोलीस कर्मचाऱ्याच्या वागणुकीबद्दल तक्रार

**पनवेल : वार्ताहर**

माजी नगरसेवक संतोष हिरामण उरणकर यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यातील एका कर्मचाऱ्याच्या वागणुकीबद्दल तक्रार केली आहे.

संतोष उरणकर यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीचे कौतुक करून तेथील शिपाई सलीम तडवी अपवाद असल्याचे सांगत बेजबाबदारपणे कसलीही भीती न बाळगता ते पासपोर्ट चौकशीच्या कामात बेडरपणे पैशाची मागणी करत उद्धटपणे वागत नागरिकांना त्रास देतात असे उल्लेखले गेले आहे. या गंभीर घटनेची तक्रार त्यांनी पोलीस आयुक्त तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक खांदेश्वर यांच्याकडे अर्जाद्वारे केली असून शिपाई सलीम तडवी यांची या विषयी चौकशी लावण्यात यावी तसेच त्यांची बदली करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. अरेरावीने बोलणे करत असल्याच्या अनेक नागरिकांच्या तक्रारी आहेत तरी तडवी यांना तत्काळ इतरत्र बदली करावी, अशी मागणी होत आहे.

## डीएफपीसीएलतर्फे क्षयरोगी रुग्णांना पोषण आहार किटचे वितरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) उपक्रमांतर्गत, दिपक फर्टीलाइझर्स अँण्ड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (DFPCL) यांनी पनवेल महानगरपालिका (PMC) यांच्या सहकार्याने आज अर्बन प्रायमरी हेल्थ सेंटर, कळंबोली येथे २०० क्षयरोगी रुग्णांना पोषण आहार किटचे वितरण केले.

या वितरण कार्यक्रमाला राजशेखर बोंथा (वरिष्ठ महाव्यवस्थापक - DFPCL) आणि डॉ. उषा राठोड (वैद्यकीय आरोग्य अधिकारी - PMC) उपस्थित होते. या उपक्रमाचा उद्देश क्षयरोगी रुग्णांच्या लवकर बरे होण्यासाठी आवश्यक पोषण सहाय्य उपलब्ध करून देणे आहे.

DFPCL पुढील सहा महिन्यांपर्यंत हा उपक्रम सुरू ठेवणार असून, आरोग्य क्षेत्रातील आपली सामाजिक बांधिलकी दृढ करत आहे आणि माननीय पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या क्षयरोगमुक्त भारत अभियानात योगदान देत आहे.

या कार्यक्रमाचे समन्वयन संदीप आर. काकडे (सहायक महाव्यवस्थापक - CSR) आणि योगेश पाटील (प्रकल्प समन्वयक - इशान्य फाउंडेशन) यांनी केले.

डीएफपीसीएलच्या प्रतिनिधींनी सांगितले की, क्षयरोग उपचार आणि रुग्णांच्या पुनर्वसनासाठी सातत्यपूर्ण पोषण सहाय्य अत्यंत महत्त्वाचे आहे. हा उपक्रम सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि क्षयरोग निर्मूलनासाठी सरकारच्या प्रयत्नांना पाठिंबा देण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

## ज्येष्ठ पत्रकार रमेश भोळे यांना अवॉर्ड जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ नाशिक यांच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त दर वर्षी महाराष्ट्रातील आपापल्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवार्ड पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. या वर्षीचा पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार व साप्ताहिक रसायनी टाइम्स चे सह संपादक रमेश भोळे यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.



पत्रकार रमेश भोळे हे बारा वर्षे कर्नाळा आज तक केबल व्हिडिओ न्यूज चॅनेलचे संपादक होते. तसेच गेली पंचवीस वर्ष साप्ताहिक रसायनी टाइम्सचे संपादक म्हणून ते काम पाहत आहेत. साईंचे सोबती या पुस्तकांचे ते लेखक असून दरवर्षी दिवाळी अंकां मध्ये तसेच साईलीला अंकांमध्ये त्यांचे अनेक लेख कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. रमेश भोळे यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याची दखल घेत त्यांना इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड जाहीर करण्यात आला आहे.

हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा मंगळवारी ६ जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजता श्री साईबाबांची पुण्यभूमी शिर्डी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. पत्रकार रमेश भोळे यांना हा पुरस्कार जाहीर सर्वस्तरातून त्यांचे हार्दिक अभिनंदन होत आहे.

Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
**Ramsheth Thakur Public School, Ulwe**
CBSE Affiliation No. 1131483 I School Code: 31472

As our institution continues to grow, we are seeking passionate and dedicated educators who are committed to inspiring young minds and contributing to our vision of academic excellence



**Staff Recruitment**
Applications are invited for the following positions for appointment from April 2026

- **Co-ordinator Pre-Primary (1), Co-ordinator Primary (1):** Post-Graduate with minimum 50% marks; B.Ed is mandatory; 5 years of experience in a CBSE school, of which 2 years in school administration is preferred
- **Pre-Primary Teacher (5):** Graduate/Post-Graduate in the relevant subject with minimum 50% marks; Early Childhood Care & Education (E.C.C.Ed.) is mandatory; Prior teaching experience in a CBSE school is preferred
- **TGT: English (1), Hindi (1), Marathi (1), Science (1), Mathematics (1), Social Science (1), Computer/ICT (1):** Graduate/Post-Graduate in the relevant subject with minimum 50% marks; B.Ed. is mandatory; Prior teaching experience in a CBSE school is preferred; CTET (Central Teacher Eligibility Test) qualification is preferred
- **PRT: English (4), Hindi (3), Marathi (3), Mathematics (4), Science (3), Social Science (2), Computer/ICT (1):** Graduate/Post-Graduate in the relevant subject with minimum 50% marks; B.Ed. is mandatory; Prior teaching experience in a CBSE school is preferred CTET (Central Teacher Eligibility Test) qualification is preferred
- **Librarian (1):** Graduate/Post-Graduate with minimum 50% marks; B. LIB / M. LIB is mandatory; Prior experience in a CBSE school is preferred
- **Dance Teacher (1):** Graduation / PG in relevant subject with minimum 50% marks; B.P.A.
- **Art & Craft Teacher (1):** Graduation / PG with minimum 50% marks; A.T.D./ B.F.A./ M.F.A./ Dip. in Fine Art / Painting / Drawing & Painting
- **Music Teacher (1):** Graduation / PG in the relevant subject with minimum 50% marks; Sangeet Visharad or BA in Music followed by a 2-year Diploma/Certificate in Music
- **Physical Education Teacher (1):** Graduation / PG in the relevant subject with minimum 50% marks; B.P.Ed. / M.P.Ed. is mandatory
- **Karate Instructor/Coach (1):** Graduation / PG in the relevant subject with minimum 50% marks; A certificate or diploma in karate or Dan grade (e.g., Black Belt)
- **Counsellor (1):** Graduation / PG in Psychology; Diploma in Counselling / Clinical Psychologist, R.C.I. Registered
- **Librarian (1):** Graduation / PG in relevant subject with min. 50% marks; B.LIB / M.LIB is mandatory
- **Receptionist (1):** Graduate / Post-Graduate with a minimum of 50% marks; good communication skills

Candidates must have completed their schooling from an English-medium institution I Excellent command over the English language is essential I Strong classroom management and effective communication skills are required I Candidates must possess working knowledge of computer applications I We offer the best salary packages to deserving and committed candidates

(Refer CHAPTER-IX of CBSE Affiliation Bye-Laws for Minimum Qualifications – TEACHERS)

**Submit Application With:** Resume, Passport Photograph, Relevant Documents (Self Attested copies)

**Apply by Post:** The Chairman, JBSP Sanstha, Ramsheth Thakur Public School, Ulwe, Plot No. 01 & 02, Sector 12, Ulwe, Navi Mumbai - 410206

**Apply by email:** rtpsulwe@gmail.com

**Apply by:** Monday, 1st December 2025

Plot no. 01, Plot no. 02, Sector-12, Ulwe, Tal-Panvel, Dist-Raigad, Pin-410206 | UDISE No.: 27244100042

For more information, call 77100 90800 I 89566 68957

Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel

## संपादकीय

# एनडीएच्या लाटेचा कौल!

अनेक वृत्तवाहिन्या व संस्थांनी जारी केलेल्या एक्झिट पोलमधून म्हणजेच मतदानोत्तर चाचण्यांमधून बिहारमध्ये सत्ताधारी भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला अर्थात एनडीएला स्पष्ट बहुमत मिळेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या एक्झिट पोलमधील अंदाज खरे ठरले तर भारतीय जनता पक्ष हाच बिहारमधील मोठा भाऊ ठरू शकेल.

**बिहारमध्ये विधानसभेच्या २४३ जागांसाठी दोन टप्प्यांत मतदान पार पडले. मंगळवारी ११ नोव्हेंबरला झालेल्या दुसऱ्या टप्प्यामध्ये आतापर्यंतचे सर्वाधिक ६८.६५ टक्के मतदान झाले. ६ नोव्हेंबरला पार पडलेल्या पहिल्या टप्प्यात ६४.६६ टक्के मतदान झाले होते. दुसऱ्या टप्प्याचे मतदान संपल्यानंतर मंगळवारी प्रमुख ९ सर्व्हेक्षण संस्थांनी केलेल्या मतदानोत्तर चाचण्यांनुसार भाजपप्रणित रालोआला १३३ ते १६७ जागा मिळण्याची शक्यता आहे. २४३ सदस्यांच्या बिहार विधानसभेत बहुमतासाठी १२२ जागा लागतील. काँग्रेस पक्ष व राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील 'महागठबंधन'ला जबर धक्का बसण्याची शक्यता बहुतांश चाचण्यांनी वर्तवली आहे. सर्व एक्झिट पोलनी एनडीएच्याच विजयाचा कौल दिला असला तरी बिहारमध्ये पूर्वीच्या निवडणुकांमधील एक्झिट पोलचे अंदाज अनेकदा चुकीचे ठरले आहेत याकडेही अनेक जण लक्ष वेधत आहेत. मतमोजणीला दोन दिवसांचा अवधी असल्यामुळे काही संस्थांचे एक्झिट पोल बुधवारी जाहीर झाले. यापैकी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या क्सिस माय इंडियानेही राष्ट्रीय लोकशाही आघाडीने महागठबंधनवर ४३ टक्के मतांसह आघाडी घेतल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. निवडणूक अंदाजशास्त्र अद्याप तरी पुरेसे प्रगत नाही असे काही लोकांचे म्हणणे असल्याचेही दिसते. कुतूहल हा माणसाचा स्वभाव असल्यामुळेच खरे तर एक्झिट पोलचा खेळ खेळला जातो. या खेळाकडे काही जण गंमतीने पाहतात तर चार दिवसांनी लागणारे निकाल आजच का असा सवालही काही जण करतात. एकंदर तथ्य असो वा नसो, एक्झिट पोलची चर्चा मात्र नक्की होते. ते काहीही असले तरी, शुक्रवारी १४ नोव्हेंबरला होणाऱ्या मतमोजणीपर्यंत थांबणेच उचित ठरते. चर्चे पुरते पाहायचे झाले तर, मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या पार्श्वभूमीवर पार पडलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीतील विक्रमी मतदानाचे रुपांतर भाजपप्रणित रालोआच्या लाटेत होणार असा अंदाज अनेक एक्झिट पोलनी वर्तवला आहे हे लक्षात घ्यावे लागेल. स्वाभाविकपणे काँग्रेसप्रणित इंडी आघाडीला एक्झिट पोलचा हा कौल मान्य होण्यासारखा नाही. कारण बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची बिहारवरील पकड ढिली करण्यासाठी त्यांच्या 'महागठबंधन'ने जंग जंग पछाडले. पण मतचोरीचे खोटेनाटे वारेमाप आरोप करणाऱ्या राहुल गांधी व तेजस्वी यादव यांचे समाजमाध्यमांवर किती हसे झाले हे संपूर्ण देशाने पाहिले आहे. एनडीएतील नेत्यांना मात्र या एक्झिट पोलने अजिबात आश्चर्य वाटणार नाही. एनडीएच्या बिहारमधील सरकारने आपल्या कार्यकाळात तेथे भरपूर विकास घडवून आणला आहे. गेल्या वीस वर्षांपासून मुख्यमंत्रीपदावर असलेल्या नितीशकुमार यांनी तसेच डबल इंजिन सरकारमुळे बिहारमध्ये बराच बदल घडून आल्याचे जनतेने अनुभवले आहे. त्याखेरीज भाजपने नेहमीप्रमाणेच नीट पूर्वतयारी करुन ही निवडणूक लढविली आहे. त्यामुळे महागठबंधनचा बार फुसका निघणार हे सगळ्यांना अपेक्षितच आहे. सगळ्यांनीच बहुमताचा १२२चा जादुई आकडा एनडीए सहज पार करून सत्तेत परतण्याची शक्यता व्यक्त केली आहे हे विशेष!**

# सार्वत्रिक निवडणुकांमुळे राज्यव्यापी अभियान निष्फळ

महाराष्ट्र राज्यात ज्या अभियानांची सुरूवात होते त्याचा आदर्श देशातील अन्य राज्यांनी घेण्यास सुरूवात केल्याचे नेहमीच अभिमानाने सांगितले जात होते. मुख्यमंत्री ग्रामसामाजिक परिवर्तन अभियान म्हणजेच मुख्यमंत्री फेलोशिप हे अभियान जसे लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांआड निष्फळ ठरले त्याच धर्तीवर यंदा सुरू झालेले मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान २०२५ देखील निष्फळ ठरण्याची लक्षणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दिसून येत आहेत.

पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक, बोरघर आणि गोवेले ग्रामपंचायतींची जलयुक्त शिवार अन् मुख्यमंत्री ग्रामीण सामाजिक परिवर्तन अभियानात निवड झाल्यानंतर नियोजित कामांचा आणि योजनांतील अंमलबजावणीच्या कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित करण्याचे आदेश या अभियानाच्या समितीच्या अध्यक्ष या नात्याने तहसिलदारांनी दिले होते. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपवर आधारित या मुख्यमंत्री ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानात व्हिलेज सोशल ट्रान्सफार्मेशन फाऊंडेशनमार्फत शिक्षण, आरोग्य, जलसुरक्षा, कौशल्यविकास तसेच लैंगिक समानता याबाबत विशेष प्रयत्न करण्याचा कॉर्पोरेट प्रयत्न सुमारे १००० गावांमध्ये होण्याची अपेक्षा होती.

मुख्यमंत्री ग्रामसामाजिक परिवर्तन अभियानामध्ये गोवेले ग्रामपंचायतीची तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींमध्ये निवड झाल्यानंतर जलयुक्त शिवार योजना आणि या अभियानातील अन्य विविध सरकारी योजनांचा एक निश्चित कालनिहाय कार्यक्रम आखण्यात आला होता. तीन वर्षात गोवेले ग्रामपंचायतीचा असा विकास करावा की ज्यामुळे येत्या काही पिढयांमध्ये या अभियानाची माहिती कायम लक्षात राहील यासाठी ग्रामस्थांनी देखील सहभागी होण्याची अत्यंत आवश्यकता आहे, असे सांगून ग्रामस्थांसोबत संवाद साधण्याचा प्रयत्न केला.

बोरघर ग्रामस्थांनी शिधापत्रिकेवरील नांवे समाविष्ठ करण्यासोबत सातबारा उताऱ्यांवर वारसनोंद करण्याकामी तहसिलदारांना अडचणी येत असल्याचे सांगितल्यानंतर तहसिलदारांनी याकामी तलाठी आणि आपण स्वत: लक्ष घालू, अशी ग्वाही दिली. गटविकास अधिकारी यांनी यावेळी महिला बचत गट, निवारा योजना, आरोग्य,विविध योजनांबाबत मुख्यमंत्री ग्राम



**खबरबात**
**शैलेश पालकर**

सामाजिक परिवर्तन अभियानातील तीनही ग्रामपंचायतीच्या विकासाचा आढावा घेत या तीनही गावांतील ग्रामस्थांनीच आपल्या समस्या स्वत: अधिकाऱ्यांसमोर मांडण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले.

पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुकसाठी मुख्यमंत्री ग्रामीण सामाजिक परिवर्तन अभियानात निवड होणे ही विकासाची पर्वणी मानावी लागेल असे सांगून विविध समस्या आणि विविध प्रस्तावित योजना आणि पाठपुराव्यानंतर अंमलबजावणीमध्ये विलंब झाल्याच्या कार्यालयीन अडचणी तत्कालीन सरपंच अजय सलागरे यांनी कथन केल्या.

विविध वैयक्तिक लाभांच्या तसेच सर्वांगिण विकासाबाबतच्या योजनांचा पाठपुरावा करताना पुणे येथे तत्कालीन मुख्यमंत्री ना. फडणवीस यांच्या मार्गदर्शनानंतर कापडे ग्रुपग्रामपंचायतीचे सर्व सहकारीवृंद दिवसरात्र एक करून प्रस्तावांच्या आणि आजपर्यंतच्या पाठपुराव्यासाठी एकजुटीने प्रयत्न केल्याने सर्व सदस्यदेखील सहकार्याची भूमिका घेऊन असल्याने आता या योजनेचा सर्वाधिक लाभ घेऊन कापडे ग्रुपग्रामपंचायतीचा कायापालट करण्यासाठी सज्ज असल्याची माहिती दिली.

मात्र, पावसाळा तसेच लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री ग्रामसामाजिक परिवर्तन अभियान गुंडाळण्यात आले. याकामी मुख्यमंत्री ग्रामीण विकास फेलोशिप कार्यक्रमांतर्गत असलेली विकासाची संधी साधण्याऐवजी मुख्यमंत्री फेलोशिपच्या नावाने तीन कर्मचारी नियुक्त करण्यात आले. मात्र, लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर हे अभियान सुस्तावले आणि कालांतराने काळाच्या पडद्याआडही गेले.

महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहिम आणि संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत पोलादपूर तालुक्याने २००७-०८ साली महत्वपूर्ण कामगिरी करून तालुक्यातील ग्रामपंचायतींना असंख्य पुरस्कारांची लयलूट करण्यात यश आले आहे. पोलादपूर तालुक्यात मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान २०२५ साठी सर्व ४१ ग्रामपंचायतींच्या विशेष ग्रामसभा बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्यात येऊन या अभियानामध्ये सहभाग निश्चित करण्यासंदर्भात ग्रामपंचायतींची तसेच ग्रामपंचायत हद्दीतील महसूली गावांची मानसिकता निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले.

तत्पूर्वी,१२ सप्टेंबर रोजी पोलादपूर तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांची संयुक्त सभा होऊन मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनावेळी मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान २०२५ हे आतापर्यंत राज्यशासनाने ग्रामपंचायत स्तरावर घेतलेल्या अभियानाची सर्वसमावेश एकत्रित भूमिका असल्याचे मत शासकीय अधिकाऱ्यांमार्फत मांडण्यात आले.

संपूर्ण राज्याप्रमाणे पोलादपूर तालुक्यात १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान राबवायचे असल्याने सुशासनयुक्त पंचायत, स्वच्छ व हरित गांव, नरेगा, ग्रामस्तरावर संस्था सक्षमीकरण, उपजिविका व सामाजिक न्याय, लोकसहभागातून, लोकाभिमुख पंचायत, नागरी सेवा सुविधा केंद्र चर्चा, तक्रार निवारण, ग्रामपंचायत वेबसाईट, सीसीटीव्ही बसविणे, लेखापरीक्षण करणे, ग्रामसभा गणपूर्ती नोंदवही अद्यावत, ग्रामविकास समित्या स्थापन करणे, विविध निर्णय डाऊनलोड करणे, आयुष्मान भारत कार्ड व लाभार्थी, अनिवार्य बाबींवरील तरतूद आणि खर्च, दिव्यांग व्यक्ती ओळखपत्र, कर व पाणीपट्टी वसुली, क्यूआर कोड वापर, लोकवर्गणी, स्वउत्पन्न जलसमृध्द, स्वच्छ व हरित गांव अंतर्गत पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सूक्ष्म सिंचनाखालील शेती क्षेत्र वाढविणे

अपारंपारिक ऊर्जा व सौर उर्जा वापर, वृक्षलागवड व संवर्धन, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान ०२ ऑक्टोबर पासून प्रभावीपणे अंमलबजावणी, प्लास्टिक बंदी, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना, नवीन विहीर, जलपुनर्भरण योजना, जनावरांचा गोठा, जलकुंड, घरकुल, ग्रामपंचायत सक्षमीकरण बैठक व्यवस्था कार्यालय वगैरे, शाळा डिजिटल व सुस्थिती, अंगणवाडी सुविधा, पशुवैद्यकीय उपचार केंद्र, स्मशानभूमीची शेड, दफनभूमी व रस्ता बैठक सुविधा, खुली व्यायामशाळा सुरू करणे, धार्मिक स्थळ व पर्यटन सुशोभीकरण, उपजिविका विकास व सामाजिक न्याय मध्ये प्रधानमंत्री आवास योजना टप्पा १ व २,

गावातील महिला बचत गट सहभाग उमेद अंतर्गत पात्र गट, कौशल्य विकास प्रशिक्षण, शेतकरी उत्पादक संघ, सामाजिक अर्थसहाय्य वंचित घटक पात्र लाभार्थी, अग्रीस्टॅक नोंदणी, जातीचे दाखले, लोकसहभाग व श्रमदानातील कामे, पाणंद रस्ते दुरुस्ती हे मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाचे निकष पाहता आतापर्यंतच्या सर्व अभियानाच्या विषयांचे हे एकत्रित अभियान आहे, हे स्पष्ट दिसून येत आहे. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान या शासनाच्या महत्वाकांक्षी अभियानाला संदर्भादिन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली.

मात्र, आगामी काळात पुन्हा सार्वत्रिक जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगरपंचायती, नगरपरिषदा आणि महानगरपालिकांच्या निवडणुकांचे वारे वाहू लागल्याने मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान देखील मुख्यमंत्री ग्रामसामाजिक परिवर्तन अभियानासारखेच गुंडाळले जाण्याची चिन्हे दिसून येत आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सअॅपमध्ये चॅट उघडताच होते ग्रीन स्क्रीन

तुम्ही जर व्हॉट्सअॅपचं बीटा व्हर्जन वापरत असाल तर तुम्हाला सावधान राहण्याची आवश्यकता आहे. अॅपच्या



बीटा २.२४.२४.५ व्हर्जनमध्ये एक मोठा बग समोर आला आहे. या बगमुळे युजर्सच्या फोनची स्क्रीन पूर्णपणे ग्रीन म्हणजेच हिरव्या रंगाची होत आहे. ही समस्या विशेषतः हजारो Android युजर्सना येत आहे. iOS बीटा टेस्टर्सना सध्या अशा कोणत्याही समस्येचा सामना करावा लागत नाही.

व्हॉट्सअॅप वापरणाऱ्यांची संख्या सर्वांत जास्त आहे. त्यामुळे त्यामध्ये नेहमीच नवनवे फिचर येत असतात, मात्र सर्वच फिचर सक्सेक होतात असे नाही. काही अपडेटमुळे धोकाही निर्माण होऊ शकतो. अशावेळी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. युजर्स चॅट किंवा मेसेज उघडण्याचा प्रयत्न करताच, स्क्रीन अचानक ग्रीन होते. अॅप बंद होईपर्यंत संपूर्ण स्क्रीन ग्रीनच दिसते. हजारो युजर्सना या समस्येचा सामना करावा लागत आहे. या समस्येबद्दल, काही युजर्सनी ट्विटरवरदेखील पोस्ट केली आहे. व्हॉट्सअॅप बीटा व्हर्जन योग्यरित्या काम करत नाही आणि व्हॉट्सअॅप वापरताना स्क्रीन पुन्हा पुन्हा ग्रीन होते. मात्र, या समस्येबाबत मेटाकडून अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.

सध्या ही समस्या व्हॉट्सअॅपच्या स्टेबल व्हर्जनमध्ये नाही. ही समस्या सोडवायची असेल तर काही स्टेप्स फॉलो कराव्या लागतील.- व्हॉट्सअॅप बीटा व्हर्जनवरून स्टेबल व्हर्जनवर स्विच करा. यामुळे तुमचं व्हॉट्सअॅप पूर्णपणे सुरक्षित होईल.- शक्य असल्यास, व्हॉट्सअॅप वेब किंवा लॅपटॉप, टॅबलेट किंवा आयफोनसारख्या इतर सर्व उपकरणांवर वापर करा. याच्या मदतीने तुम्ही बग टाळू शकता- व्हॉट्सअॅप अनइन्स्टॉल करून पुन्हा इन्स्टॉल करा, परंतु हे करण्याआधी Google Cloud वर तुमच्या मेसेजचा बॅकअप घ्यायला विसरू नका.

# आद्य मराठी नाटककार गोविंद बल्लाळ देवल



**निमित्त**

प्रसिद्ध नाटककार आणि नाट्यदिग्दर्शक म्हणून गोविंद बल्लाळ देवल यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म सांगली संस्थानातील हरिपूर येथे १३ नोव्हेंबर १८५५ रोजी झाला.

वडील बल्लाळ ऊर्फ बाळाजीपंत हे अल्प वेतनावर संस्थानी नोकर होते. देवलांचे ज्येष्ठ बंधू कृष्णाजीपंत यांचा संगीतशास्त्राचा मोठा व्यासंग होता. मधले बंधू रामभाऊ हे त्या काळी प्रसिद्ध असलेल्या इचलकरंजीकर नाटक मंडळीतील एक उत्तम नट होते. देवलांचे मराठी शिक्षण प्राथमिक शाळेत आणि संस्कृतचे अध्ययन खासगीरीत्या, हरिपूरला झाले असावे. वडील बंधूना नोकरी लागल्यावर कोल्हापूर व बेळगाव येथे माध्यमिक शिक्षण होऊन १८७८मध्ये ते मॅट्रिक झाले. बेळगावच्या रहिवासात सुप्रसिद्ध नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्याशी त्यांचा दाट परिचय झाला. पुढे पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजातील शेतकी शिक्षणवर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण करून देवलांनी १८८०मध्ये प्रमाणपत्र मिळविले. सांगलीचा नाट्यानुकूल परिसर, वडील बंधू संगीशास्त्रज्ञ, दुसरे बंधू हे कुशल नट आणि किर्लोस्करांसारखे मुरब्बी नाट्यगुरू असे त्यांच्या भोवतालचे वातावरण नाट्याला पोषक होते. साहजिकच अल्पकाळ शिक्षकाचा व्यवसाय केल्यावर देवलांनी हयातभर नाट्यसेवेला वाहून घेतले.

पुण्यात असताना देवल आणि शंकरराव पाटकर यांनी आर्योद्धारक नावाची नाटक मंडळी नाट्यकलेला नवे वळण लावण्याच्या हेतूने स्थापन केली. वेणीसंहार नाटकातील अश्वत्थामा आणि महादेवशास्त्री कोल्हटकरांच्या अथेल्लोमधील अजितसिंग या त्यांच्या भूमिका विशेष गाजल्या. महादेवशास्त्र्यांनी शेक्सपिअरच्या ऑथेल्लो या मूळ नाटकाचे भाषांतर केले होते. त्यावरून अजितसिंग ही रंगावृत्ती तयार करण्यात आली होती. ती करण्याच्या कामीही देवलांनी आपल्या लेखणीचा हातभार लावला. १८८० साली किर्लोस्कर नाटक मंडळी स्थापन झाली. किर्लोस्कर पद्धतीची नाट्यपदे रचण्यात देवल कुशल होते. किर्लोस्करांच्या शाकुंतलातील शकुंतलेची पदे देवलांनी रचली व त्या मंडळीचे ते आधारस्तंभ बनले. गणपतराव बोडस, काशिनाथपंत परचुरे, बालगंधर्व यांसारख्या नटश्रेष्ठांना देवलांनी तालीम देऊन तयार केले.

देवलांनी इंग्रजीवरून तीन, संस्कृतवरून तीन व एक स्वतंत्र अशी एकूण सात नाटके रचली. टॉमस सदर्नकृत द फेट्ल मॅरेजवरुन गॅरिकने तयार केलेल्या इझाबेला या रंगावृत्तीच्या आधारे दुर्गा, शेक्सपिअरकृत ऑथेल्लोची रंगावृत्ती झुंझारराव व मर्फी आणि मोल्येर यांच्या अनुक्रमे ऑल इन द राँग आणि गॉनारेल या नाटकांवरुन फाल्गुनराव अथवा तसबिरीचा घोटाळा ही त्यांची परकीय नाट्यकृतींची रूपांतरे होत. त्यांच्या मृच्छकटिक, झुंझारराव आणि संशयकल्लोळ यांना प्रायोगिक यश विशेष लाभले. तथापि यांहीपेक्षा त्यांचे सं. शारदा हे नाटक साहित्यिक आणि प्रायोगिक या दोन्ही दृष्टींनी अद्वितीय ठरले. शारदेसारखी अस्सल सामाजिक नाट्यकृती तत्पूर्वी मराठी रंगभूमीवर आलेली नसल्याने मराठी सामाजिक रंगभूमीचा पाया घालण्याचे श्रेय देवलांना मिळते. मधुमेहाच्या विकाराने त्यांचे १४ जून १९१६ रोजी मिरज येथे देहावसान झाले. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### नाक बंद होतंय? वास येत नाही? आजारांचे लक्षण

नाक बंद असताना कोणत्याही गोष्टीचा वास न येणे हे एक सामान्य लक्षण आहे. पण दीर्घकाळ वास न येणे हे धोकादायक ठरू शकते. शंभराहून अधिक रोगांचे प्रारंभिक लक्षण म्हणजे कोणत्याही गोष्टीचा वास न येणे. त्यामुळे जर तुम्हाला ही बऱ्याच काळापासून कोणत्याही प्रकारचा वास



येत नसेल, तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या. कारण एका संशोधनानुसार हे अनेक प्रकारच्या आजारांमुळे देखील होऊ शकते. अनेकदा काही विशिष्ट आजारामुळे लोकांना कोणत्याही प्रकारचा दुर्गंध जाणवत नाही. थंडीत नाक बंद होण्यापासून ते कोविडमध्ये लोकांना काहीही वास न येण्यापर्यंत अशी लक्षणेही आपण पाहिली आहेत.

कोणत्याही प्रकारचा दुर्गंध जाणवणे ही आपल्या पाच इंद्रिपैकी एक आहे जे आपल्याला लहानपणापासूनच मिळते परंतु काही आजारांमुळे आपली ही भावना काम करणे थांबून जाते. त्यामुळे आपली कोणत्याही गोष्टीचा वास घेण्याची क्षमता नष्ट होते. नुकत्याच झालेल्या एका संशोधनानुसार, १३९ वैद्यकीय परिस्थिती आहेत ज्यामध्ये कोणताही वास घेण्याची आपली क्षमता नष्ट होते.

चार्ली डनलॉप स्कूल ऑफ बायोलॉजीकल सायन्सेसच्या संशोधकांनी, द ऑक्सफर्ड रिसर्च सेंटर इन द ह्युमॅनिटीच्या सहकार्याने असे संशोधन केले आहे, ज्यामध्ये अशा प्रकारच्या १३९ वैद्यकीय परिस्थितीचा मानवी वास घेण्याच्या क्षमतेशी संबंध असल्याचे आढळून आले आहे. ज्यामुळे रुग्ण कोणत्याही प्रकारची दुर्गंधीचा वास घेऊ शकत नाही. हे लक्षण अगदी सामान्य मानले जात असले तरीदेखील हे विविध न्यूरोलॉजिकल आणि शारीरिक रोगांचे प्रारंभिक लक्षण असू शकते. त्याचा संबंध एखाद्या व्यक्तीच्या स्मरणशक्तीशीही असल्याचा आढळून आले आहे.

अलझायमर आणि पार्किन्सन्स सारख्या आजारांशी देखील संबंध आहे. या संशोधनानुसार जर कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही गोष्टीचा वास न आल्यासारखी लक्षणे जाणवत असतील तर त्यांनी ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# रोहा अष्टमी बँक मालमत्ता लिलावात गैरव्यवहार

## ठेवीदारांच्या आंदोलनापुढे प्रशासन नमले



**धाटाव : प्रतिनिधी**

दि रोहा अष्टमी अर्बन बँकेची इमारत आणि जागेच्या लिलाव महाराष्ट्र सरकारच्या सहकार विभागाने रद्द करण्याचे आदेश दिले. तरीही रायगड जिल्हा उपनिबंधकांनी या लिलाव प्रक्रियेला स्थगिती दिली नाही, शिवाय बिल्डरचे नाव थेट बँकेच्या प्रॉपर्टी कार्डवरच चढवले. यामुळे संतप्त झालेल्या ठेविदारांनी प्रशासनाच्या विरोधात उपोषणाचे हत्यार उपसले. यामुळे हादरलेल्या प्रशासनाने बँक इमारत खरेदी रद्द करण्यासाठी थेट कोर्टात धाव घेतली. तसेच इमारतीचा ताबा सोडणार नसल्याचे स्पष्ट केले. तसे लेखी पत्र जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांनी आंदोकांना दिल्याने आंदोलकांनी १७ नोव्हेंबर रोजीचे नियोजित उपोषण स्थगित केले.

या वेळी रोहा सिटिझन फोरमचे अध्यक्ष नितीन परब यांनी बँक इमारत लिलावात गैरव्यवहार केल्याने कष्टोडियन निलेश शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल करावा व कोर्टात दावा चालू असेपर्यंत कष्टोडियन यांना निलंबित करावे अशी मागणी केली.रोहा अष्टमी अर्बन बँकेच्या इमारतीसह जमीन बँकेचे कस्टोडियन निलेश शिंदे यांनी ठेवीदार आणि भागभांडवलदार यांना अंधारात ठेवून, कवडीमोल भावात लब्धी बिल्डरच्या घशात घातली. या मालमत्तेची किंमत चार कोटी असताना अवघ्या एक कोटी दहा हजार रुपयांत हा व्यवहार करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे बिल्डरचे नातेवाईक रोहा अष्टमी अर्बन बँकेचे थकीत कर्जदार असतानाही हा व्यवहार करण्यात आला.

बँक इमारत लिलाव प्रकरणात अनियमितता झाल्याचे पत्र सहकार विभागाच्या अवर सचिव मंजुषा साळवी यांनी जिल्हा उपनिबंधकांना पाठवले होते. मात्र तरीही दहा महिने जिल्हा उपनिबंधकांनी स्थगितीबाबतीत कार्यवाही केली नाही. त्यामुळे कारवाईचा नुसता आव नको कारवाईच हवी असा इशारा देत, बँकेची शेवटची मालमत्ता असलेली इमारत वाचवण्यासाठी निब्बर प्रशासनाच्या विरोधात ठेविदारांनी उपोषणाचे हत्यार उपसले होते.

## माथेरान पालिका निवडणुकीसंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांचा पाहणी दौरा

**माथेरान : बातमीदार**

माथेरान नगरपालिका निवडणुकीच्या तयारी संदर्भात रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे आणि रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी प्रत्येक्ष माथेरान नगरपालिका येथे सर्व अधिकारी वर्गासोबत बैठक घेऊन चर्चा विनिमय करून पालिका निवडणुकीच्या कामाची पाहणी केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कार्यक्रम जाहीर झाला आहे. यामध्ये माथेरान नगर पालिकेचा समावेश असून काल बुध.दि १२ रोजी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे आणि रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी माथेरानला भेट दिली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी निवडणूक अधिकारी वर्गासोबत निवडणूक प्रक्रियेबद्दल माहिती घेऊन यावर चर्चा विनिमय करून योग्य मार्गदर्शन केले तसेच संपूर्ण परिसराची पाहणीदेखील केली.



या वेळी माथेरान निवडणूक अधिकारी तथा अधीक्षक सुरेंद्र सिंह ठाकूर, मुख्याधिकारी राहुल इंगळे आणि त्यांची सगळी टीम उपस्थित होती. तसेच उपस्थित अधिकारी वर्गाल या वेळी काही सूचनादेखील करण्यात आल्या. रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनीदेखील आपल्या टीम ला मार्गदर्शक सूचना केल्या.

## शासकीय जप्त केलेली मालमत्तेची परस्पर विक्री, गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील कुसगाव या गावातील जमीन क्षेत्र ११ हेक्टर हे शासन दरबारी जप्त असताना, आरोपीने संगणमताने या मालमत्तेची परस्पर विक्री केल्याप्रकरणी महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी महाड औद्योगिक वसाहत पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार माहिर दाऊद पांगले वय ५७ रा महाड यांनी दिलेल्या तक्रारी नुसार आरोपी अशरफ शेख हुसेन काझी व सोफिया अश्रफ काझी दोघे राहणार कोट आळी तालुका महाड यांनी मौजे कुसगाव येथील क्षेत्र ११ हेक्टर जमीन २० सप्टेंबर २०२२ रोजी शासन राजपत्र सप्टेंबर २०२२ शासनाने जप्त केली असताना यातील आरोपी यांनी दिनांक २० डिसेंबर २०२२ रोजी दुय्यम निबंधक महाड यांचे कडील दस्त क्रमांक ३८८८/ २०२२ अन्वे सदरची मिळकत तक्रार व साक्षीदार यांना विक्री करून त्यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने खोटे खरेदीखत करून शासनाच्या जप्ती आदेशाचा भंग केलेला आहे.

याप्रकरणी आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सुदर्शन सीएसआर फाउंडेशनतर्फे 'सुधा-सितारा शिष्यवृत्ती कार्यक्रम २०२५-२६' जाहीर करण्यात आला आहे. शिक्षण क्षेत्रातील सामाजिक जबाबदारीचा एक भाग म्हणून हा उपक्रम राबविण्यात येत असून, विद्यार्थ्यांना २१ नोव्हेंबर पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याची संधी दिली आहे.

या शिष्यवृत्तीसाठी ११ वीपासून पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षापर्यंत शिक्षण घेणारे विद्यार्थी पात्र असतील. अर्जदारांनी दहावी किंवा बारावी परीक्षेत किमान ७० टक्के गुण मिळवलेले असणे आवश्यक आहे. पदवीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मागील वर्षाचे गुणही किमान ७० टक्के असावेत. विद्यार्थ्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न तीन लाख रुपयांपेक्षा कमी असणे अपेक्षित आहे.

या शिष्यवृत्तीत ५० टक्के मुली, २५ टक्के मुले आणि २५ टक्के दिव्यांग विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. 'सुधा-सितारा' ही शिष्यवृत्ती फक्तरायगड जिल्ह्यातील रहिवासी आणि जल्ह्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागू आहे.अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून, विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा.या शिष्यवृत्तीच्या मागील वर्षातील उपक्रमातून अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक बळ मिळाले आहे

# भाल विठ्ठलवाडी, वाशी ते आळंदी पायी वारी

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील भाल - विठ्ठलवाडी, वाशी ते आळंदी अशी १५ वी पायी वारी प्रस्थान शनिवारी ८ नोव्हेंबर रोजी करण्यात आले. हा वारी सोहळा १७ नोव्हेंबर पर्यंत चालणार आहे. ही पायी वारी हभप देवळे गुरुजी व हभप शंकर तुकाराम पाटील वाशी यांच्या आशीर्वादाने व हभप दत्तात्रेयबुवा ओढांगीकर यांच्या मार्गदर्शनाने अविरत १५ वर्षे जात आहे.



दिंडीमध्ये पहाटे ५ वाजता काकडा, सकाळी ६ वाजता मृदुंग टाळाच्या गजरात नाम संकीर्तनपर भजन म्हणत दिंडीचे प्रस्थान होते. संध्याकाळी ६ वाजता हभप बंटी उर्फ दिलीप महाराज ओढांगी यांचे प्रवचन, सायंकाळी ७ वाजता विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ भाल विठ्ठलवाडी, अक्कादेवी हरिपाठ मंडळ सारेभाग, जगदंबा हरिपाठ मंडळ वाशी या सर्वांचा सामुदायिक हरिपाठ होईल, दिंडीत मृदुंग साथ किरण झेमसे व गायन साथ जयेश महाडिक यांची असणार आहे, कीर्तन हभप यश महाराज बडेकर व हभप ज्ञानराज निवृत्ती पाटील बळवली यांचे कीर्तन होईल. आकाशवाणी दूरदर्शन कलाकार गुरुवर्य हभप दत्तात्रय बुवा ओढांगीकर यांचे संगीत भजन होईल. या वारीत कामार्ली, खोपोली महालक्ष्मी मंदिर कार्ला, वडगाव देहू,आळंदी या ठिकाणी रात्रीच्या वस्त्या असतील.

## कर्जतमधून आंळदीकडे पायी दिंडीचे मार्गस्थ

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातून अनेक वर्षे आंळदीला पायी दिंडी जाते. हालिवली येथील ह.भ.प मारुती महाराज राणे यांच्या मार्गदर्शनाखाली व ह. भ. प. दिलीप महाराज राणे नेतृत्वाखाली कर्जत तालुक्यातील हालिवली ते आंळदी अशा कोकण विभागीय पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. सकाळी दिंडी हालिवली येथून आंळदी येथे जाण्यास निघाली. या पायी दिंडीचे हे एकतीसावे वर्ष आहे.

हालिवली येथुन निघालेली पायी दिंडी रेल्वे लाईन ओलांडुन छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ आली. त्याठिकाणी कर्जतच्या माजी नगराध्यक्ष वनिता म्हसे व दत्तात्रेय म्हसे यांनी या दिंडीचे स्वागत केले. याप्रसंगी शिवलाल गुप्ता, संतोष वैद्य, दिलीप बडेकर, साजन ओसवाल, सदानंद जोशी, कृपाराम लोवंसी, लीलाताई चंदन, सुचिता वांजळे, स्वाती देशमुख आदी उपस्थित होते. त्यानंतर ही दिंडी बाजार पेठेतून श्री कपालेश्वर मंदीरा जवळ आली. त्यानंतर कशेळे परिसरातून आलेली पायी दिंडीही कपालेश्वर मंदिरात आली आणि मंदिरात अभंग, भजन सादर करून पळसदरी मार्गे आंळदी कडे मार्गस्थ झाली.




**नामाकित कंपनीसाठी खालील जागा भरणे आहे**

- सिव्हील इंजिनिअर (RMC) = १
- अकाऊंट असिस्टंट = १
- सुपरवायजर = १
- ड्रायव्हर (LMV) = १

**वरिल पदासाठी किमान १ते २ वर्षे अनुभव असल्यास प्राधान्य देण्यान येईल**

**संपर्कसाठी :- ८८७९५९५९७४**

**ड्रायव्हर पाहिजे**

**फॉर्च्युनर कारसाठी ड्रायव्हर पाहिजे**

१०२, सी-विंग, साक्षी पार्क-२, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र)

माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई-४१०२०६

संपर्क

मोबाईल : ८१०८४००२१४

Email : ekanathpatil4141@gmail.com


## माणगाव शहरात मोफत नेत्र शिबिरात ३२ रुग्णांवर शस्त्रक्रिया

**माणगाव :** शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार दि. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ९६ रुग्णांची तपासणी करून ३२ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सदरचे शिबीर हे दर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी आयोजित केले जाते.


**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दुरध्वनी क्र. : ०२२-२७४५८०४०/४१/४२. फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
Email Id : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | सेक्रेटरी, कोशीश फाउंडेशन, प्लॉट नं. ५५, एम.सी.सी.एच. पनवेल, पुरोहित हॉस्पीटल जवळ, पनवेल, जि. रायगड. | ०३ बदाम व ०१ जांभुळ अशी एकूण ०४ झाडे तोडणी तसेच ०२ जांभुळ झाडे पुनर्रोपण करणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील जुना मुंबई-पुणे हायवे, तक्का सिग्नल येथील डॉमीनोज समोरील ट्रान्सफॉर्मर असलेल्या सार्वजनिक मोकळ्या जागेतील ०६ झाडे कोशीश फाउंडेशनच्या माध्यमातुन उभारण्यात येणाऱ्या शिल्पकला कामामध्ये बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/पुनर्रोपण करणेची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावयात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
(स्वरुप खारगे)
उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

PMC-PARK/668/2025-PTAD
दिनांक :- १२/११/२०२५



**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दुरध्वनी क्र. : ०२२-२७४५८०४०/४१/४२. फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
Email Id : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

**जाहिर ई- निविदा सुचना कालावधी - ३ वर्ष**

सन २०२५-२०२६, सन २०२६-२०२७ व सन २०२७-२०२८ या ३ वर्षाकरिता पनवेल महानगरपालिका कार्यालयातील अधिकारी व पदाधिकारी तसेच विभागांच्या आवश्यक मागणीप्रमाणे सनबोर्ड, विनिल बोर्ड व ॲक्रालिक बोर्ड पुरविणेकामी जाहिर ई निविदा प्रसिद्ध करून दर निश्चित करणेकामी अंदाजपत्रक करणेबाबत तयार या कामासंबंधीचसविस्तर तपशील www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर व भांडार विभागात उपलब्ध आहे.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र.५९१/६१२/२०२५
दिनांक :- १२/११/२०२५

सही/-
(अभिषेक पराडकर)
उपायुक्त (भांडार)
पनवेल महानगरपालिका



Rayat Shikshan Sanstha's

**Modern School & Jr. College Vashi, Navi Mumbai**

**TENDER NOTICE**

Tenders are invited from reputed firms/companies through e-Tendering process for the Proposed Construction of Compound Wall.

The detail information of tender such as tender fess, terms, conditions and technical specifications of the tender process is available on our web site https://edumart.sets.co.in Tender must be submit online to this website from **13-11-2025 to 25-11-2025 @ 5.00 pm.**

**Principal,**
**Modern School & Jr. College Vashi, Navi Mumbai.**



**पनवेल महानगरपालिका**

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

दुरध्वनी क्र. : ०२२-२७४५८०४०/४१/४२. फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५५७५१ उपायुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९
Email Id : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

**ई-निविदा सुचना**

पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील प्राथमिक शाळांमध्ये ज्युनिअर, सिनिअर केजी व इ. १ली ते इ. ८ वी (मराठी, उर्दु व गुजराती) माध्यमातील विद्यार्थ्यांना व्यवसाय पुस्तके, व्याकरण व उपयोजित लेखन पुस्तके, कला व कार्यानुभव पुस्तिका व स्टेशनरी साहित्य इत्यादीचा पुरवठा करणेबाबतच्या कामाची ई-निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल कडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधित निविदा धारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र.५८५/६०६/२०२५
दिनांक :- १२/११/२०२५

सही/-
उपायुक्त (शिक्षण)
पनवेल महानगरपालिका



**वेदविद्या गुरुकुलम्**

कोलखे पारपुण्ड गांव, पोस्ट ओ.एन.जी.सी. एन. एच.-४ शिफा हॉस्पिटल के पीछे, ताकुला- पनवेल, नवी मुंबई पिन ४१०२२१

(महर्षि सांदीपनि राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान, उज्जैन (म.प्र.)

(शिक्षा मंत्रालय, भारत सरकार की स्वायतशासी संस्था द्वारा तात्कालिक रूप से अनुदानित)

**आवश्यकता**

**अध्यापक - संस्कृत-सामाजिक विज्ञान (संयुक्त-०१)**

आयु- न्यूनतम २५ वर्ष, अनुभव ०१ वर्ष का अनुभव

**शैक्षणिक योग्यता -**

B.A. (संस्कृत) अथवा पारंपरिक शास्त्रों में शास्त्री (B.A.) उत्तीर्ण किया हो। संस्कृत शास्त्र के अध्ययन के साथ स्नातक स्तर में इतिहास, भूगोल, राजनीति विज्ञान, अर्थशास्त्र में से किसी एक विषय का अध्ययन एवं उत्तीर्णता आवश्यक है। संस्कृत-सामाजिक विज्ञान अध्यापक को योग एवं कम्प्यूटर का बेसिक ज्ञान/अभ्यास कराने का सामर्थ आवश्यक है।

M.A. (संस्कृत) अथवा किसी शास्त्र में आचार्य (M.A.) उत्तीर्ण एवं B.Ed./ शिक्षा शास्त्री धारी अभ्यर्थी को प्राथमिकता दी जाएगी।

मासिक मानदेय रु ३०,०००/- प्रतिमाह

**(यह कार्य मानदेय आधारित सेवा है, स्थायी/पद आधारित सेवा नहीं है।)**

अध्यापक की तात्कालिक सेवाएं महर्षि सांदीपनि राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान, उज्जैन (म.प्र.) के मानदेय अनुसार होगी।

उपर्युक्त संदर्भ में अभ्यर्थी अपने सभी अभिलेखों एवं आधार कार्ड की स्व प्रमाणित छाया प्रति के साथ प्रार्थना पत्र प्रबंधक / सचिव पाठशाला का नाम एवं पता के नाम से डाक द्वारा अथवा स्वयं उपस्थित होकर अंतिम दिनांक तक पाठशाला कार्यालय में जमा करें।

**३०/११/२५ अंतिम तिथि के पश्चात प्राप्त आवेदन पत्रों पर विचार नहीं किया जाएगा।**

पाठशाला का संपर्क सूत्र : ९८१९०७४०९७/६३०६४००१४६

# नवीन पनवेलमध्ये रस्ते दुरूस्ती सुरू

## वेगाने कामे करा; आयुक्तांच्या सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्वच प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे जोमाने सुरू आहेत. नुकतीच पनवेल प्रभागातील रस्त्यांची अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी प्रत्यक्ष पहाणी केली होती. त्यानूसार रस्ते दुरूस्तीच्या कामास वेग देण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या त्यानूसार नवीन पनवेल मधील रस्ते दुरूस्ती कामे वेगाने केली जात आहेत. आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार ही कामे सुरू आहेत.



नवीन पनवेलमधील एचडीएफसी सर्कल ते डी मार्ट रोड पाऊसामुळे अत्यंत खराब झाला होता. या रस्त्याचे डांबरीकरण वेगाने सुरू आहे. नुकत्याच झालेल्या बैठकित आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी खराब झालेल्या रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानूसार अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी तत्काळ रस्ते दुरूस्ती करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचित केले होते.

शहर अभियंता संजय कटेकर व कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे यांच्या मार्गदर्शनाखाली चारही प्रभागामध्ये कनिष्ठ अभियंत्याच्या देखरेखीखाली रस्ते दुरूस्तीची कामे केली जात आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील तळोजा, नवीन पनवेल, खारमधील आवे पेठ, खारघरमध्ये सेक्टर ३४ फुटबॉल मैदान, सेक्टर २०, शिल्प चौक ते तवा जंक्शन, कामोठेमधील मानसरोवर स्थानकाकडून शहराकडे जाणारा रस्ता अशा विविध ठिकाणी सध्या रस्ते दुरूस्तीची कामे जोरात सुरू आहेत.

# कोपरखैरणेत अनधिकृत बांधकामावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उपायुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत महापे गाव येथील सर्वे नं ८० च्या मागील बाजूस झालेल्या अनधिकृत बांधकामावर मा.न्यायालयाच्या आदेशानुसार



६.५० चौ.मी द ६.०० चौ.मी क्षेत्रफळाचे बांधकाम निष्कासित करण्यात आले.

सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी मा. डॉ. कैलास गायकवाड, उपायुक्त (अतिक्रमण), कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त भरत ऊ धांडे, कनिष्ठ अभियंता चंद्रकांत धोत्रे व इतर अधिकारी/कर्मचारी व न.मुं.म.पा पोलीस बंदोबस्त उपस्थित होते. तसेच सदर कारवाईसाठी १२ मजूरांचा व एका पिकअप व्हॅनचा वापर करण्यात आला. यापुढेदेखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले आहे.

# उरणमध्ये फ्लेमिंगोंचे आगमन लांबणीवर

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यात हवामान बदल आणि नष्ट होत चाललेल्या पाणथळ जागांमुळे दरवर्षी ऑक्टोबर मध्ये फ्लेमिंगो पक्षांचे होणारे आगमन यंदा उशिरा होणे हा पर्यावरणाच्या दृष्टीने धोक्याचा इशारा आहे.यंदा नोव्हेंबर पर्यंत लांबलेल्या पावसामुळे वातावरणात बदल झाला आहे.परिणामी ऑक्टोबर अखेर आणि नोव्हेंबरमध्ये पहिल्या साप्ताहात येणाऱ्या फ्लेमिंगो पक्षांचे आगमन लांबणीवर पडणार असल्याची माहिती पर्यावरण वाद्यांनी दिली आहे.

हा हवामान बदल आणि नष्ट होणाऱ्या पाणथळ जागां चा परिणाम आहे. मान्सून्नानंतरच्या पावसामुळे हवामानातील बदल झाला आहे. त्यामुळे या वर्षी हे पक्षी उशिरा येणार असल्याची माहिती पर्यावण तज्ञांनी दिली आहे.यामध्ये मुख्य कारण नवी मुंबईसह उरण व पनवेल तालुक्यातील नष्ट होणाऱ्या जागांचा परिणाम आहे. फ्लेमिंगो हे निरोगी पर्यावरणाचे दूत आहेत.

फ्लेमिंगो पक्षी ज्यावेळी एखाद्या भागात मोठया संख्येने येतात, तेव्हा त्याचा अर्थ पाणथळ जागा जिवंत असतात.त्यामुळे त्यांचे उशिरा आगमन हा ही एक धोक्याचा इशारा आहे. अशी माहिती पर्यावरणवादी बी.एन. कुमार यांनी दिली आहे.तर दुसरीकडे अतिवृष्टी, भरती – ओहोटी पूर आणि समुद्राच्या पातळीत वाढ होण्याचा सामना सामना करणाऱ्या किनारी शहरामधील पाणथळी सुरक्षित राहिल्या पाहिजेत.

पाणथळ जागा या हवामानाच्या दृष्टीने संरक्षणात्मक पायाभूत सुविधा आहेत. त्याचप्रमाणे फ्लेमिंगो पाणथळ जागा आरोग्य राखण्यास देखील मदत करतात. फिल्टर – फिडर म्हणून ते सूक्ष्म शैवाल आणि लहान अपृष्ठवंशी प्राणी खातात आणि आहार देतांना गाळ हलवतात ही प्रक्रिया बायोटब्रशन म्हणून ओळखली जाते. जी चिखलाला ऑक्सिजन देते आणि पोषक संतुलनसही मदत करते.



# नमुंमपा आयुक्तांकडून रस्ते सुधारणा कामांची पाहणी

## गुणवत्ता राखून जलद कामे पूर्ण करण्याचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाने उघडीप घेतल्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार अभियांत्रिकी विभागामार्फत रस्ते सुधारणा कामांना वेग देण्यात आला असून आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्यासह सीवूड परिसरातील रस्ते बांधकामांची पूर्वसूचना न देता आकस्मिकरित्या प्रत्यक्ष जागी पाहणी करुन कामाची गुणवत्ता राखत कामे जलद पूर्ण करण्याचे निर्देश दिले. यावेळी कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे उपस्थित होते.



यावर्षी मे महिन्यापासून संतत पर्जन्यवृष्टी असल्यामुळे ज्याठिकाणी खड्डे पडले आहेत त्याच्या पूर्णपणे दुरुस्तीसाठी अनेक अडचणी उद्भवल्या. तसेच विविध नागरी सेवांसाठी वेगवेगळया प्राधिकरणांमार्फत रस्ते खोदण्यात आले होते. पावसाळी कालावधीमुळे त्यांचे व्यवस्थित पुनर्पृष्ठीकरण शक्य झाले नाही. त्या अनुषंगाने नागरिकांकडूनही रस्त्यांबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होत होत्या. त्यास अनुसरुन रस्ते सुधारणा कामांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे असे निर्देश आयुक्त महोदयांकडून अभियांत्रिकी विभागास देण्यात आले होते. त्यानुसार सर्वच विभागांमध्ये रस्ते सुधारणा कामे हाती घेण्यात आली आहेत.

या कामांची सद्यस्थिती प्रत्यक्ष पाहण्यासाठी आयुक्तांनी सीवूड परिसरात से.४६, ४८ व ५० या परिसरातील रस्ते सुधारणा कामांना पूर्वसूचना न देता आकस्मिक भेट दिली व त्याठिकाणच्या अस्फाल्टींग कामाचे परीक्षण केले. यामध्ये रस्त्याच्या पृष्ठभागाचे व्यवस्थित पुनर्पृष्ठीकरण करण्यात यावे. प्रथमतः रस्त्याचे खड्डे व उतार दुरुस्ती आवश्यकतेनुसार बीएम थराने करून घ्यावी व रस्त्याचे पृष्ठीकरण डांबरीकरणाने करण्याची काळजी घ्यावी तसेच डांबराचे थर टाकतांना तापमान १२० डिग्री सेंटीग्रेडच्या कमी नको याची काळजी घेण्याचेही निर्देश त्यांनी दिले व सुरु असलेल्या कामाच्या तांत्रिक बाबींची खातरजमा करुन घेतली.

कामे करतांना गुणवत्ता राखणे गरजेचे आहे हे स्पष्ट करीत ही कामे ८ ते १० दिवसात जलद पूर्ण करावीत तसेच त्याठिकाणचे जलवाहिन्यांचे कामही तत्परतेने करण्यात यावे असे निर्देश देतानाच या कामांचे त्रयस्थ संस्थेमार्फत परीक्षण करुन घ्यावे असे निर्देश आयुक्तांनी दिले.

# उलवेत जागतिक विचित्र वीणा दिन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वीणा वेणू आर्ट फाउंडेशनच्या पुढाकाराने उलवे सेक्टर १० डेल्टा कॉम्प्लेक्स येथील फाउंडेशनच्या हॉलमध्ये १९ नोव्हेंबर २०२५ रोजी पहिला जागतिक विचित्र वीणा दिवस साजरा होणार आहे. या वेळी विचित्र वीणा रत्न सन्मान पुरस्कार भारतातील ज्येष्ठ कलाकार पं. कृष्णचंद्र गुप्त यांना प्रदान करण्यात येणार असल्याचे वीणा वेणू आर्ट फाउंडेशनच्या संचालिका डॉ. राधिका वीणासाधिका यांनी सांगितले आहे.

विचित्र वीणा या प्राचीन भारतीय वाद्यांचा प्रसार आणि प्रचार व्हावा, म्हणून विचित्र वीणेच्या विविध पैलूंना स्पर्श करणारी सात विशेष ग्रंथ पुस्तके प्रकाशन, संशोधन निबंध, विद्यार्थी स्पर्धा, फेलोशिप योजना, चित्रमाला, विचित्र वीणा प्राचीन कला जनजागृती अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय संवाद आणि विचार मंथन या वेळी होणार आहे.

कार्यक्रमात भोपाळ, पुणेसह देशातील विचित्र वीणा प्राचीन कला, संगीत, साधना आणि परंपरा जतन करणारे पंडित, कलाकार आणि साधक उपस्थित राहणार असल्याचे प्रमुख आयोजक डॉ. राधिका वीणासाधिका यांनी सांगितले.

# ज्येष्ठ बौध्दजन महासंघाची नवी मुंबईत स्थापना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बौध्द समाजातील ज्येष्ठ नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांची सोडवणूक करतानाच विविध क्षेत्रातील त्यांचे ज्ञान आणि अनुभवाचा लाभ नव्या तरुण पिढीला मिळवून देण्यासाठी ' ज्येष्ठ बौध्दजन महासंघ ' या नव्या संघटनेची स्थापना सोमवारी नवी मुंबईत करण्यात आली आहे. त्याची घोषणा खारघर येथील सत्याग्रह कॉलेजमध्ये झालेल्या एका बैठकीनंतर करण्यात आली.



शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी निमंत्रित केलेल्या त्या बैठकीला निरनिराळ्या क्षेत्रांतील अनुभव संपन्न ज्येष्ठ बौध्द कार्यकर्ते उपस्थित होते. ही बैठक ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला डॉ. आनंद नरंगलकर, माजी विक्रीकर उपायुक्त रमेश चक्रे, डॉ. नीळकंठ शेरे, ड. किशोर कांबळे, उत्तमराव गायकवाड, बँक कर्मचारी नेते सतीश डोंगरे, डी. जे. सोनकांबळे, एच.बी. जाधव, अरविंद खरात, ड. रत्नमाला डोंगरगावकर, एन. एम. वाघमारे, माधव मून, जगदीश कांबळे, सुनिल कासारे, जयश्री शेरे, तुकाराम कांबळे, बळीराम शिंदे आदी उपस्थित होते.

एएमआरडी म्हणजे मुंबई महानगर प्रदेशाची लोकसंख्या तीन कोटींपेक्षा आहे. त्यात २० टक्के म्हणजेच सुमारे ६० लाख ज्येष्ठ नागरिक असून त्यांच्यातील ६ टक्के म्हणजे साडे तीन लाखांहून अधिक जेष्ठ बौद्ध समाजातील आहेत.विशेष म्हणजे, त्यातील सुमारे ७० टक्के ज्येष्ठ बौद्ध नागरिक हे पेन्शन धारक नसल्यामुळे स्वावलंबी नाहीत, अशी धक्कादायक माहिती प्रा. डोंगरगावकर यांनी बैठकीत दिली. त्या ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक असुरक्षितता, एकाकीपण, वैद्यकीय उपचार, आपत्कालीन मदत – सेवेचा अभाव, आदी समस्यांनी घेरले आहे, असे त्यांनी सांगितले.

राज्यातील सर्व महापालिका आणि नगर पालिकांच्या क्षेत्रांत ज्येष्ठ बौध्दजन महासंघाच्या शाखा स्थापन करून ज्येष्ठ बौध्द नागरिकांची निःशुल्क सभासद नोंदणी सुरू करण्याचा निर्णयही या नव्या संघटनेने घेतला आहे.

एकट्या एमएमआरडीए क्षेत्रातच मुंबई, ठाणे, कल्याण–डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, भिवंडी–निजामपूर, वसई–विरार, मीरा–भाईंदर, पनवेल या महानगर पालिका आहेत. तसेच अंबरनाथ, बदलापूर, माथेरान, कर्जत, खोपोली, पेण, उरण, अलिबाग, पालघर या नगर पालिकांचाही त्यात समावेश आहे. त्यामुळे सभासद नोंदणीचा पहिला टप्पा एमएमआरडीए क्षेत्रातच पार पाडला जाईल, अशी घोषणा ज्येष्ठ बौध्दजन महासंघाने केली आहे.

# 'आर्यभट्ट अवकाश निरीक्षण केंद्र शास्त्रज्ञ निर्माण करणारे प्रयोगपीठ'

**नवी मुंबई : बातमीदार**

रा.फ.नाईक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय कोपरखैरणे येथे, असणाऱ्या आर्यभट अवकाश निरीक्षण केंद्रास,डॉ.होमी भाभा अणुशक्ती संशोधन केंद्राच्या, ४५ पेक्षा अधिक वर्ष सेवा देणाऱ्या आणि देशातील नामवंत शास्त्रज्ञ डॉ.सी.व्हि.रमण यांच्या एकेकाळच्या सहकारी, भारतीय महिला शास्त्रज्ञ असोसिएशनच्या विश्वस्त डॉ.ललिता धारेश्वर आणि असोसिएशनच्या उपाध्यक्ष सुपर्णा कामथ यांनी भेट देऊन आपले अनुभव कथन करून मुलांना मार्गदर्शन केले. आर्यभट्ट अवकाश निरीक्षण केंद्र शास्त्रज्ञ निर्माण करणारे प्रयोगपीठ असल्याचे डॉ. धारेश्वर यांनी सांगितली.



संस्थेत मान्यवर शास्त्रज्ञ यांचे राज्यघटना प्रत देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर त्यांनी मुलांसोबत संवाद साधत, त्यांच्या प्रश्नांना तसेच विज्ञान शिक्षक यांच्या सोबत चर्चा करत हसत खेळत सर्व शंका समाधान व्यक्त करून, विज्ञान बद्दल मुलांना सजग आणि अवघड, किचकट वाटणारा विषय हा आर्यभट अवकाश निरीक्षण केंद्रामुळे खूप सोपा झाला असल्याचे नमूद केले. अशा प्रकारच्या लॅब सर्व शाळांमध्ये होणे गरजेचे आहे, असे सांगून विद्यालयाच्या प्रगती, निकाल, खेळातील प्राविण्य,स्वच्छता याबद्दल विशेष कौतुक करून तसा अभिप्राय आपला भेट रजिस्टर मध्ये नोंदवून सर्व विद्यार्थी,शिक्षक आणि संस्थेचे त्यांनी मनापासून अभिनंदन केलं. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ.उमेश पळनिटकर, उपप्राचार्यचारुशीला चौधरी, पर्यवेक्षक नसीम कुरणे, शोभा नाईक, दिपाली महाडिक/ जाधव आणि प्रियांका देवरे या शिक्षकांनी मोलाचे योगदान दिले, तर लॅब नेहमीच अद्ययावत ठेवणारे, सचिन भोसले, सुरेश सुर्वे यांचेदेखील प्राचार्य रवींद्र पाटील यांनी कौतुक केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रशासकीय अधिकारी नरेंद्र म्हात्रे, श्रमिक शिक्षण मंडळ यांचे अध्यक्ष संदीप नाईक यांनी शुभेच्छा दिल्या आणि भविष्यात विज्ञान आणि तंत्रज्ञान स्नेही विद्यार्थी घडवले जावेत ही अपेक्षा व्यक्त केली.

# ज्येष्ठ नागरिक संघाच्या निवडणुकीची चुरस

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा जेष्ठ नागरिक संघाची निवडणुक होणार आहे. एकूण ३२ सदस्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. चार उमेदवारांनी माघार घेतल्याने २८ उमेदवार निवडणूक रिंगणात कायम आहेत. निवडणुकी दरम्यान सौदर्हाचे वातावरण कायम ठेवण्यासाठी निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांच्या अध्यक्षेतखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे.१५ नोव्हेंबर रोजी मतदान होणार असल्याने सानपाडावासियांना उत्कंठा लागून राहिली आहे

भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली सामोपचार बैठक घेण्यात आली. या निवडणुकीत माजी पदाधिकारी उभे राहणार नसल्याने नव्यांना संधी मिळणार आहे. एकूण अकरा जागांसाठी एकावडे जगदीश नारायण, कदम राजेंद्र गेनबापू, खरात भरत बाबूराव, गोळे लक्ष्मण बाबुराव, घोलप शंकर राजाराम, देसाई जगन्नाथ पांडुरंग, नागपुरे देवदत्त सोमेश्वर, नांदवडेकर बाबुराव आत्माराम, पाटील महादेव बंडू, पाटील शुभांगी सदाशिव, बोराडे सीमा शंकर, मानधने मंगलाबाई गोवर्धनजी, लांडगे राजदत्त आत्माराम, विश्वासराव मारुती किसन , शिंदे नाना महादेव आणि शेजाळे अमोल भगवान असे सोळा उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

# रोहिदास पोटे यांच्या 'गझलगंधाक्षरी' ग्रंथास पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मराठी साहित्य परिषद प्रतिवर्षी वाङ्मय व वाङ्मयेतर पुरस्कारांचे वितरण करते. २०२३–२४चे पुरस्कारांचे वितरण नुकतेच मालगुंड येथे करण्यात आले. त्यात पनवेल येथील ज्येष्ठ साहित्यिक कोमसाप पनवेल शाखेचे सल्लागार रोहिदास पोटे यांच्या 'गझलगंधाक्षरी' या समीक्षात्मक पुस्तकाला प्रभाकर पाध्ये स्मृती समीक्षा प्रथम पुरस्कार कोमसापचे विश्वस्त व आमदार संजय केळकर यांच्या हस्ते, कोमसाप विश्वस्त प्रा. एल. बी पाटील, केंद्रीय अध्यक्षा नमिता कीर, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ, कार्यवाह माधव अंकलगे, सहकार्यवाह प्रा.दीपा ठाणेकर, रायगड जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी तसेच कोमसापचे सर्व जिल्हा अध्यक्ष आदींच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

रोख पाच हजार, सन्मानचिन्हे, सन्मानपत्र शाल श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. या वेळी पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके, उपाध्यक्ष नागनाथ डोलारे व सहसचिव राजकुमार ताकमोघे उपस्थित होते. रोहिदास पोटे यांचे कवितासंग्रह, लेखसंग्रह व समीक्षा ग्रंथ मिळून १३ पुस्तके प्रसिध्द असून त्यांचे गझल संशोधन चालू आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ गझलकार अे.के. शेख, ज्येष्ठ साहित्यिका ॲड. सुनिता जोशी,के. गो.लिमये, वाचनालयाचे उपाध्यक्ष वी.पी.म्हात्रे, काशिनाथ जाधव व दत्तात्रय जाधव या मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.



# पाली शहरात पाण्याची गळती कायम

## नगरपंचायतीने लक्ष देण्याची मागणी



**पाली : रामप्रहर वृत्त**

पाली नगरपंचायत हद्दीतील गांधी चौक मार्गावर गेल्या अनेक दिवसांपासून पाण्याची गळती सुरू असून, शेकडो लिटर पाणी वाया जात आहे. या गळतीमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, सार्वजनिक आरोग्यावरही धोका निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही नगरपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, अशी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. काही ठिकाणी गटाराजवळच पाण्याच्या वाहिन्या फुटल्यामुळे दुषित पाणी रस्त्यावर साचत आहे, आणि त्यामुळे सांघिक आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शहरात एकीकडे पाणीटंचाईचे संकट गडद होत असताना, दुसरीकडे शेकडो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जाणे नागरिकांच्या पाण्याच्या हक्कावर अन्याय करणारे असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.गेल्या अनेक दिवसांपासून गळती सुरू आहे, पण नगरपंचायतीला ती दिसत नाही का? असा थेट सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# जनावरांना बेशुद्ध करून अवैध वाहतूक; आरोपींना अटक

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वरसई फाट्याजवळ जनावरांना गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध करून अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात पेण पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांना अटक केली असून एक आरोपी फरार झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी महिंद्रा झायलो व इको गाडी या दोन चारचाकी वाहनांमधून चार जनावरांना बेशुद्ध अवस्थेत कोंडून वाहतूक केली होती, याची माहिती मिळताच पेण पोलिसांनी वरसई फाट्याजवळ सोमवारी (ता. १०) रात्री सापळा रचून ही कारवाई केली. याप्रकरणी शफिक रफिक अन्सारी (२५), इम्रान मलंग पटेल (३६) रा. मुंब्रा, सलमान अब्दुल अहमद पटेल (३६), सोनू जुबेर खान (२२) आणि बाजल राशीद शेख (पनवेल) या आरोपींना अटक केली आहे. तर अजिज शेख (रा. तळोजा) हा आरोपी फरार असून त्याचाही पोलिसांकडून शोध सुरू आहे. पोलिस निरीक्षक संदीप बागूल यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

# तळा येथे पोलीस पाटीलांचा सत्कार

**तळा : प्रतिनिधी**


तळा येथे गाव कामगार पोलीस पाटील संघटना व पोलीस स्टेशन तळा यांचे विद्यमाने तळा तालुक्यातील उल्लेखनीय कामगिरी करणारे पोलीस पाटील व सेवानिवृत्त पोलीस पाटील यांचा सत्कार ११ नोव्हेंबर रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी माणगाव श्री. सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत पार पडला.

सदरप्रसंगी पोलीस निरीक्षक सतिश गवई गाव कामगार पोलीस पाटील संघटनेचे विश्वस्त कमळाकर मांगले सचिव नेहा साळवी, खजिनदार किशोर कदम, पोलीस पाटील पोलीस आदी उपस्थित होते. या वेळी उल्लेखनीय काम केलेले संघटनेचे तालुकाध्यक्ष कांतीलाल कसबले, माजी अध्यक्ष नागराज पवार व किशोर कदम यांना मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले तसेच सत्कारमूर्ती वैशाली घोसाळकर, श्रीरंग खेडेकर, राजाराम राऊत, सुरेंद्र राऊत, भागोजी कानसेन यांचाही मान्यवरांचे हस्ते सन्मान करण्यात आला.

यामुळे पोलीस पाटलांना काम करण्यास प्रोत्साहन मिळेल. गावपातळीवर पोलीसांचे काम करत असतात. त्यांना बर्याच अडचणी येत असतात तरीही ते न डगमगता आपले काम करत असतात.

आपलच गाव व आपली माणस असल्यामुळे त्यांना त्रास होतो परंतु ते आपले काम करत असतात. व नागरिकांना येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करत असतात. गावातील तंटे मिटवत असतात. गाव तंटामुक्त राहण्यासाठी सदैव कार्यतत्पर राहतात. यामुळे त्यांचा सन्मान सोहळा पोलीस ठाणे येथे करण्यात आला.





**खोपोली : भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या दिनदर्शिकाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, भाजप शहराध्यक्ष अजय इंगुलकर, महिला शहराध्यक्ष अश्विनी अत्रे, युवा नेते विक्रम साबळे, कर्जतचे राजेश भगत, मनीष खवळे, नितेश शहा, खालापूर तालुका अध्यक्ष सनी यादव, तांबाटी माजी सरपंच अनिल जाधव आदी उपस्थित होते.**

# टाकाऊतून टिकाऊ : माणगावच्या विद्यार्थ्यांचा आगळावेगळा उपक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या इंग्रजी माध्यम शाळेतील इयत्ता पहिलीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी टाकाऊतून टिकाऊ वस्तू तयार करून सृजनशीलतेचा आगळावेगळा नमुना सादर केला आहे. शाळेच्या शिक्षिकांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला नवसंजीवनी मिळाली आहे.



टाकाऊ म्हणजेच वापरात न येणाऱ्या वस्तूंमधूनही सुंदर कलाकृती निर्माण करता येतात, हे या चिमुकल्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. नारळाच्या करवंट्या, बाटल्यांचे झाकण, प्लास्टिकचे तुकडे, जुन्या कागदांपासून त्यांनी आकर्षक वस्तू – शोपीस, तबला, फुलदाणी, प्राण्यांच्या प्रतिकृती आणि घरगुती सजावटीच्या वस्तू तयार केल्या. या स्पर्धेला विद्यार्थी आणि पालक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लहान मुलांच्या कल्पकतेतून साकारलेल्या या वस्तूंनी प्रदर्शनात सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

बालपणापासूनच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक विचार, टाकाऊ वस्तूंचा योग्य वापर आणि सृजनशीलता विकसित व्हावी हा आमचा हेतू आहे, असे शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा मोरे यांनी सांगितले. शाळेमध्ये शिक्षणाबरोबरच कृतीतून शिकण्यावर विशेष भर दिला जातो. त्यामुळे अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानच नाही तर पर्यावरणाची जाण, जबाबदारी आणि सौंदर्यदृष्टीही मिळते.माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या या उपक्रमाचे व लहान वयातच सर्जनशीलतेचे बीज पेरणाऱ्या या विद्यार्थ्यांचे होत आहे.

# चरई खुर्द ग्रामपंचायतीमध्ये इलेक्ट्रिक घंटागाडीचे लोकार्पण

**तळा : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत स्वच्छता अभियानाच्या पुढाकारातून ग्रुप ग्रामपंचायत चरईखुर्द येथे ग्रामपंचायतीच्या स्वनिधीतून खरेदी करण्यात आलेल्या इलेक्ट्रिक घंटागाडीचे लोकार्पण तळा नगपंचायतीचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांचे हस्ते बेलघर येथे करण्यात आले.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हा मागासवर्गीय सेलचे अध्यक्ष अॅड्. उत्तम जाधव, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, विस्तार अधिकारी पुष्पा नेरकर, सरपंच प्रवीण आंबार्ले, उपसरपंच लक्ष्मणभोईर, तसेच अजय सावंत, सुभाष खिडबीडे, मंगेश तांबे, रश्मी आंबार्ले, हर्षदा भोईर, प्रतीक्षा सकपाळ, राजेश खैरे, विजय आंबार्ले व सायली मोहिते, तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

ग्रामीण भागात घंटागाडी आल्याने ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या गावांना याचा चांगला फायदा होऊन ग्रामीणभाग यामुळे स्वच्छ होण्यास मदत होईल. ग्रामस्वच्छतेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# साई प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत आरोग्य शिबिर

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील साई येथे छावा प्रतिष्ठान माणगांव तर्फे साई प्राथमिक आरोग्य केंद्रात लायन्स हेल्थ फाउंडेशन अलिबाग व लायन्स क्लब ऑफ माणगांव यांच्या मार्फत भाजपा युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष निलेश थोरे व भाजपा महिला मोर्चा तालुका अध्यक्षा रचना थोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत १० नोव्हेंबर रोजी मोफत आरोग्य शिबिर घ्येण्यात आले.



या वेळी भाजप युवा मोर्चा तालुका अध्यक्ष निलेश थोरे, भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्षा रचना थोरे, वैद्यकीय अधिकारी प्रियांका वाढवळ, तालुका उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, साई विभाग उपाध्यक्ष निलेश दळवी, जेष्ठ नेते आनंद लाड, माणगाव तालुका कामगार मोर्चा अध्यक्ष महादेव कदम, माणगाव तालुका महिला मोर्चा सरचिटणीस सोनाली दसवते, समीर बक्कम, अनिल लाड,दिपेश जंगम, अमोल पवार, अनिकेत कांबळे इत्यादी उपस्थित होते.

या शिबिरामध्ये मोफत आरोग्य तपासणी, मोफत औषधे वाटप, मोफत शस्त्रक्रिया, मोफत डोळे तपासणी, मोफत चष्मा वाटप, मोफत मोतीबिंदू, शस्त्रक्रिया, कचबिंदू व रेटीना तपासणी, जनरल चेक अप, बी. पी. चेक इत्यादी आरोग्य विषयक तपासण्या करण्यात आल्या.

# माणगाव तालुक्यात कालवा दुरुस्तीची गरज

## ■ पाण्याची पातळी घसरली, सिंचन घटले, शेतकरी हवालदिल

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात साधारण ५० वर्षापूर्वी सुरू झालेला काळ प्रकल्प हा शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण मानला गेला होता. सिंचनाचा विस्तार, शेतीची उत्पादनवाढ, आणि गावागावांत पाण्याचा स्थिर पुरवठा हा या प्रकल्पाचा उद्देश होता. मात्र आज, या प्रकल्पाचे वास्तव चित्र वेगळेच दिसते. प्रकल्पावर कोट्यवधी रुपये खर्च झाले असले तरी अपेक्षित परिणाम साधता आलेले नाहीत.



काळ प्रकल्पावरील या सिंचन योजनेचा प्रारंभ सुमारे १९७० च्या सुमारास करण्यात आला. १९७७ मध्ये काळ प्रकल्प प्रत्यक्षात सुरू झाला. प्रकल्पासाठी शासनाने सुमारे ११० कोटींचा अंदाजित खर्च मंजूर केला होता. सुरुवातीच्या आराखड्यानुसार सुमारे ३५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. प्राथमिक टप्प्यात काही गावांमध्ये कालवे व उपकालवे पूर्ण झाले आणि शेतकऱ्यांना पहिल्या दोन वर्षांत काही प्रमाणात पाणी उपलब्ध झालेही, मात्र त्यानंतर सिंचनामध्ये घट होत गेली.

गेल्या काही वर्षांत कालव्यांची गळती, गाळ साच, व देखभालीचा अभाव यामुळे कालव्यांची वहन क्षमता घटली. परिणामी, सध्या केवळ सुमारे १८०० हेक्टर क्षेत्रावरच प्रत्यक्ष सिंचन होत आहे, असे स्थानिक जलसंपदाच्या स्त्रोतांवरून समजते. काही गावांमध्ये तर पाण्याचा पुरवठा पूर्णपणे बंद पडला आहे. २०१० मध्ये तत्कालीन जलसंपदा मंत्री सुनील तटकरे यांनी माणगाव आणि मोरबा कालव्याची मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती केली होती. परंतु ती अपुरी पडल्यामुळे गळती सुरुच राहीली आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

माणगाव परिसरातील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, सुरुवातीला पाणी मिळाल्याने भात, भाजीपाला, कलिंगड, खरबूज आणि हंगामी पीक वाढले, पण आता प्रकल्पातले पाणी शेवटपर्यंत पोहोचत नाही. आमच्या विहिरी आणि तलावही कोरडे पडले आहेत. काही शेतकऱ्यांनी पाणीटंचाईमुळे शेतीला वाळवंटाकडे जाण्याची भीती व्यक्त केली आहे. या प्रकल्पाला कवडीमोल भावाने सरकारने जमीन संपादन केली. मात्र प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचे आदेश कालव्याच्या पाण्यात वाहून गेले. नाईलाजाने आता कालव्याचे पाणी बंद झाल्याने कडधान्ये घेतली जातात, मात्र त्यावर उदरनिर्वाह आणि गुजराण होत नाही. त्यामुळे अनेक शेतकर्यांची अतिशय बिकट आणि हलाखीची अवस्था झाली आहे. त्यांच्यावर आता उपासमारीची वेळ आली आहे. आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना अशा कात्रीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.

**पाण्याची पातळी आणि विहिरींची अवस्था**

स्थानिक भूजल विभागाच्या आकडेवारीनुसार, माणगाव तालुक्यातील भूजल पातळी मागील ८ वर्षांत २.५ ते ३ मीटरने खाली गेली आहे. अनेक विहिरी कोरड्या पडल्या असून, तलावांमध्ये वर्षभर पाणी टिकत नाही. चार्यासाठीची कुरणे कोरडी झाल्याने पशुधनासाठी अन्न–पाण्याचा तुटवडा निर्माण झाला आहे.

**अतिक्रमणाचा परिणाम**

माणगाव परिसरात अलीकडे झपाट्याने झालेले नागरीकरण आणि औद्योगिक विस्तार यामुळे अनेक कालवे व नाले अतिक्रमणाच्या विळख्यात आले आहेत. परिणामी पाणीपुरवठ्याची रचनाच विस्कळीत झाली आहे. या अनियंत्रित नागरी विस्तारामुळे पावसाचे पाणी साठवण आणि भूजल पुनर्भरण या दोन्ही गोष्टींना मोठा धक्का बसला आहे.

**उपाययोजना गरजेच्या –**

तज्ज्ञांच्या मते, काळ प्रकल्प व त्याचे कालवे यांची तत्काळ दुरुस्ती, गाळ काढणी आणि गळती बंदी करणे अत्यावश्यक आहे. त्याचबरोबर ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन पद्धतींचा प्रसार, भूजल पुनर्भरण प्रकल्प, तसेच ग्रामीण जलसंवर्धन समित्यांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे.

# रोहा नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी कागदपत्रे काढण्यासाठी इच्छुक उमेदवारांची लगबग

**रोहे : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक जाहीर झाल्यानंतर रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांची धावपळ सुरू झाल्याचे दिसून येत असुन निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या कार्यकर्त्यांची कागदपत्रासाठी धावपळ सुरू झाले आहे.



रोहा तालुका हा राष्ट्रवादी पक्षाचा बालेकिल्ला या बालेकिल्लात होत असलेल्या रोहा अष्टमी नगरपरिषदची निवडणूक ही चुरशीची होणार असल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादीच्या बालेकिल्लांमध्ये शिवसेना (शिंदे गट) ने राजकीय वेग वाढवला आहे. राष्ट्रवादी पुढे आव्हान उभे केले आहे.

रोहा अष्टमी नगरपरिषदेमध्ये मागील निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाची सत्ता होती. मागील निवडणुकीत राष्ट्रवादी १३ तर एक उमेदवार जुबेर चोगले वगळता बाकीच्यां अपक्ष म्हणून निवडून आलेल्या उमेदवारांनी राष्ट्रवादीची वाट पकडली होती.

यावेळी जागा वाढल्याने अनेकांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे राष्ट्रवादी ( अजित पवार गट ) शिवसेना ( शिंदे गट ) शिवसेना (उबाठा) भाजपा यासह अन्य राजकीय पक्षांनी मोर्चा बांधणी करीत उमेदवारी अर्ज भरण्याची तयारी सुरू केली आहे.

या निवडणुकीत ३ जागा वाढल्याने आता २० सदस्य निवडून द्यायचे आहेत. तर थेट नगराध्यक्ष पद लढत असल्याने यातही चुरस वाढणार आहे.

रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी १७६६९ मतदार आहेत. यामध्ये ८६४१ पुरुष व ९०२८ महिला मतदार आहेत. रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या १० प्रभागांचा विचार करता प्रभाग क्रमांक १ अष्टमी कासार आळी, मराठा आळी, आंबेडकर नगर यामध्ये मतदार संख्या पाहता पुरुष ९८४ स्त्रिया १०३२ एकुण २०१६, प्रभाग क्रमांक २ अष्टमी वरचा मोहल्ला, अष्टमी खालचा मोहल्ला रायकर पार्क पुरुष ९३५ स्त्रिया ९९२ एकुण १९२७, प्रभाग क्रमांक ३ रोहा खालचा मोहल्ला, महात्मा फुले नगर, म्हाडा वसाहत पुरुष ७३०, स्त्रिया ७८३ एकुण १५१३, प्रभाग क्रमांक ४ सुंदरनगर, सिद्धार्थनगर, मोरे आळी पुरुष ९३१ स्त्रिया ९९६ एकुण १९२७, प्रभाग क्रमांक ५ सोनरआळी, बाजारपेठ, वरचा मोहल्ला पुरुष ६९७, स्त्रिया ६९५ एकुण १३९२, प्रभाग क्रमांक ६ अंधार आळी, धनगर आळी, बाजारपेठ पुरुष ८३५ स्त्रिया ८४२ एकुण १६७७, प्रभाग क्रमांक ७ बाजारपेठ, रोहा कोलाड रोड, नेहरु नगर पुरुष ९०२, स्त्रिया १००४ एकुण १९०६, प्रभाग क्रमांक ८ रायकर पार्क, दमखाडी, त्रिमूर्तीनगर पुरुष ७६७, स्त्रिया ८०४ एकुण १५७१, प्रभाग क्रमांक ९ त्रिमूर्तीनगर, गणेशनगर, छत्रपती संभाजी नगर पुरुष ८४६, स्त्रिया ८३०, एकुण १६७६

# मुंबई विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत पनवेलच्या महात्मा फुले कॉलेजचे सुयश

## पार्थ मानेची १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात विज्ञान शाखेत शिकत असलेल्या पार्थ राकेश माने याने नुकत्याच मुंबई विद्यापीठ आयोजित मुंबई झोन क्र.१च्या एथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे.

मुंबई विद्यापीठाच्या क्रीडा विभागाकडून दरवर्षी या क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. मुंबई विद्यापीठ क्षेत्रातील अनेक मातब्बर खेळाडूंशी टक्कर देत



महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करताना पार्थने वयाच्या १८ व्या वर्षी मिळविलेले हे यश सर्व युवकांना प्रेरणा देणारे आहे. त्याच्या या उज्ज्वल यशामुळे पनवेल महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

पार्थच्या या सुवर्ण कामगिरीबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, पार्थ माने हा विद्यार्थी म्हणजे आमच्या महाविद्यालयाचे भूषण आहे. त्याच्या जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याने लहान वयातच खूप मोठ्या यशाला गवसणी घातली आहे. त्याचे रायफल शुटींगमधील कौशल्य थक्क करणारे आहे. आपल्या कामगिरीत त्याने असेच सातत्य ठेवले तर तो देशासाठी ऑलिंपिकमध्येही सुवर्णपदक जिंकू शकेल, याची मला खात्री आहे. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी पार्थ मानेचे व त्याच्या कुटुंबियांचे विशेष अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी त्याला शुभेच्छा दिल्या.

पार्थ माने याच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, अरुणशेठ भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर व संजय कडू आदी मान्यवरांनी विशेष कौतुक केले. यासोबतच समाजाच्या विविध स्तरांतून विद्यार्थ्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे जिल्हास्तरीय सेपक टकरामध्ये घवघवीत यश



**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयास सेपक टकरामध्ये घवघवीत यश मिळाले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत, जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड, अलिबाग व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने सेपक टकरा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यात रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने १७ वर्षाखालील गटात जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये तृतीय स्थान मिळविले आहे. रुद्र सुनील पाटील, समर्थ महेंद्र म्हात्रे, करण दिपक सुरडकर, हरीश मनोज सिंह, नाविन्य नंदकिशोर गुरव या सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रविण पाटील आणि महेंद्र पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व स्पर्धकांचे प्राचार्या निशा नायर यांनी अभिनंदन केले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी आदींनी अभिनंदन केले.

# महिला अंध टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघ सज्ज




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय क्रीडा क्षेत्रात एक ऐतिहासिक क्षण आलेला आहे. जगातील पहिल्यावहिल्या महिला अंध टी-२० विश्वचषकात सहभागी होण्यासाठी भारतीय अंध महिला क्रिकेट संघ सज्ज झाला आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने ११ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

समर्थनम ट्रस्ट फॉर द डिसेबल्डची क्रिकेट शाखा आणि उपक्रम असलेल्या क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाच्या सहकार्याने इंडसइंड बँक त्यांच्या सीएसआर उपक्रमाद्वारे भारतीय संघाला पाठिंबा देते. या स्पर्धेत ऑस्ट्रेलिया, भारत, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका आणि अमेरिका या सात देशांचा समावेश असेल. नवी दिल्ली, बेंगळुरू आणि कोलंबो येथे हे सामने होणार आहेत.

बँकेच्या सहकार्याबद्दल इंडसइंड बँकेचे कॉर्पोरेट, कमर्शियल आणि ग्रामीण बँकिंग प्रमुख संजीव आनंद म्हणाले की, अंधांसाठीच्या जगातील पहिल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेची तयारी करत असलेल्या भारतीय अंध महिला क्रिकेट संघाला पाठिंबा देण्याचा आम्हाला अभिमान आहे. इंडसइंड बँकेत आम्ही सर्वसमावेशकतेला सर्वाधिक महत्त्व देतो.

या भागीदारी बद्दल क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाइंड इन इंडियाच्याचे अध्यक्ष डॉ. महांतेश जी. किवदासन्नावर म्हणाले की, दृष्टिहीन खेळाडूंना सक्षम बनवण्याच्या आमच्या ध्येयाला भक्कम पाठबळ देण्यासाठी आम्ही इंडसइंड बँकेचे मनापासून आभारी आहोत. या गुणी महिलांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यात आणि खेळाच्या माध्यमातून देशाला सन्मान मिळवून देण्याचा त्यांचा उदात्त हेतू पूर्ण करण्यात बँकेच्या सहकार्याने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**स्पर्धेसाठी १६ सदस्यीय भारतीय संघ**

काव्या एन.आर, जमुना रानी तुडू, करूणा कुमारी, गंगा कदम, काव्या व्ही, पार्वती मार्नदी, फुला सारेन, सिमरनजीत कौर, सिमू दास, सुनीता सारथे, अनेखा देवी, सुषमा पटेल, अनु कुमारी, बसंती हंसदा, दुर्गा येवले, दीपिका टी.सी.

# टीम इंडियातून शमीला वगळल्याने गांगुली भडकला

**कोलकाता** : टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या




आगामी कसोटी मालिकेसाठी संघात स्थान मिळालेले नाही. विशेष म्हणजे शमीने भारताबद्दल शेवटचा सामना चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५मध्ये खेळला होता. त्यानंतर तो सातत्याने संघाबाहेरच राहिला आहे. आता यावरुनच भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुली याने शमीची पाठराखण करत टीम इंडियाच्या निवडकर्त्यांना खडे बोल सुनावले आहेत.

सौरव गांगुली याने वृत्तसंस्था ‘पीटीआय’शी बोलताना सांगितले की, मोहम्मद शमी कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० या तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतासाठी खेळू नये, असे कोणतेही कारण दिसत नाही. त्याचे कौशल्य खूप मोठे आहे, असेही गांगुलीने म्हटले.

# सलग तिसऱ्यांदा परदेशात होणार आयपीएल लिलाव प्रक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**




क्रिकेट जगतातील सर्वात लोकप्रिय इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेच्या आगामी हंगामासाठी डिसेंबरमध्ये मिनी लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे. आगामी हंगामासाठी संघ बांधणीसाठी या वेळी भारतातील शहरातच लिलाव प्रक्रिया पार पडेल, अशी अपेक्षा होती, पण पुन्हा एकदा लिलाव प्रक्रिया ही भारताबाहेर पार पडणार आहे.

पीटीआयने बीसीसीआयच्या अधिकाऱ्याच्या हवाले दिलेल्या वृत्तानुसार आयपीएलच्या आगामी हंगामासाठी नियोजित मिनी लिलाव प्रक्रिया भारताबाहेर पार पडणार आहे. त्यामुळे सलग तिसऱ्या वर्षी आयपीएलमधील खेळाडूंवर परदेशात बोली लागल्याचे पाहायला मिळणार आहे. याआधीच्या दोन हंगामासाठी सौदी अरेबियातील जेद्दाह आणि दुबईत लिलाव प्रक्रिया झाली होती.

बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने पीटीआयला दिलेल्या माहितीनुसार १५ आणि १६ डिसेंबरला आगामी आयपीएल हंगामासाठी मिनी लिलाव प्रक्रिया पार पडण्याची शक्यता आहे. लिलावासाठी अबू धाबी हे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे. बीसीसीआयने या संदर्भात कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. लवकरच याची घोषणा होईल, अशी अपेक्षा आहे.

**१५ नोव्हेंबर रिटेन्शनची शेवटची मुदत**


आयपीएलच्या आगामी हंगामासाठी होणाऱ्या मिनी लिलावाआधी सर्व १० फ्रँचायझींना १५ नोव्हेंबरपर्यंत कोणत्या खेळाडूंना कायम ठेवले आणि कुणाला रिलीज केले या संदर्भातील माहिती बीसीसीआयला कळवायची आहे. दरम्यान, सध्या ट्रेड विंडोही खुली करण्यात आली असून या माध्यमातून फ्रँचायझी अदलाबदलीच्या खेळातून तगडा डाव खेळताना दिसतील.

# ध्रुवला प्लेइंग ११मध्ये संधी मिळण्याची शक्यता

## माजी खेळाडूने सुचवला पर्याय

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघातील यष्टीरक्षक फलंदाज ध्रुव जुरेल सध्या तुफान फॉर्ममध्ये आहे. दक्षिण आफ्रिका अ संघाविरूद्धच्या मालिकेतील दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यातील दोन्ही डावांमध्ये त्याने दमदार शतके झळकावली. या दमदार कामगिरीनंतर त्याला दक्षिण आफ्रिकेविरूद्ध होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी प्लेइंग ११मध्ये स्थान देण्याची मागणी जोर धरू लागली आहे, पण ऋषभ पंत संघाचा भाग असताना ध्रुवला संधी कशी मिळणार?असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, माजी क्रिकेटपटू व समालोचक आकाश चोप्राने यावर उपाय सांगितला आहे.



भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेतील पहिला कसोटी सामना १४ नोव्हेंबरपासून कोलकात्यातील ईडन गार्डन्सच्या मैदानावर होणार आहे. दक्षिण आफ्रिका अ संघाविरूद्ध झालेल्या दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यातील पहिल्या डावात त्याने १३२ आणि दुसऱ्या डावात फलंदाजी करताना त्याने १२७ धावांची खेळी केली. या खेळीसह त्याने मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. तो भारतीय अ संघाकडून खेळताना एकाच सामन्यात दोन शतके झळकावणारा दुसरा फलंदाज ठरला आहे. याआधी हा विक्रम नमन ओझाच्या नावावर होता.

आकाश चोप्राने आपल्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना म्हटले की, भारतीय संघाच्या ध्रुव जुरेलला प्लेइंग ११मध्ये जागा मिळायला हवी, पण ऋषभ पंतला बाहेर करून नाही. प्लेइंग ११मध्ये ध्रुव जुरेल आणि ऋषभ पंत दोघांनाही संधी दिली जाऊ शकते. पंत खेळणारच कारण तो संघाचा उपकर्णधार आहे, पण ध्रुवही संधी मिळायला हवी.

ध्रुव जुरेलचा फॉर्म पाहता, त्याला प्लेइंग ११मध्ये संधी मिळायलाच हवी. पण त्याला कोणाच्या जागी संधी मिळणार? याबाबत बोलताना आकाश चोप्रा म्हणाला, ध्रुवला संधी देण्यासाठी तुम्ही साई सुदर्शनला बाहेर करणार का? मला तरी वाटते, साईला तिसऱ्या क्रमांकावर खेळू द्या. नितीश कुमार रेड्डीच्या जागी ध्रुवला संधी दिली जाऊ शकते. आता खरोखरच ध्रुवला संधी मिळणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# संजूच्या जागी जडेजा की सॅम करन होणार ट्रेड?

**चेन्नई : वृत्तसंस्था**



अनेक महिन्यांपासून राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन हा चेन्नई सुपर किंग्जकडून खेळणार असल्याची चर्चा सुरू आहे. संजू जर सीएसकेमध्ये येणार असेल, तर या संघाचा रवींद्र जडेजा किंवा सॅम करन राजस्थान रॉयल्सकडून खेळणार असण्याची शक्यता आहे.

आयपीएल इतिहासातील सर्वात मोठी ट्रेड डील जवळपास फायनल झाली आहे. आयपीएल २०२६ची रिटेंशन डेडलाईन ही १५ नोव्हेंबर आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार राजस्थानला संजू सॅमसनच्या बदल्यात रवींद्र जडेजा आणि सॅम करनची मागणी केली. राजस्थान संघ संजू सॅमसनच्या ट्रेड डीलमधून जास्ती जास्त पदरात पाडून घेण्याच्या तयारीत आहे.

जर सीएसके आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील ही डील फायनल झाली, तर सीएसकेचा अनेक काळापासूनचा खेळाडू रवींद्र जडेजा आपली जुनी अन् पहिली फ्रेंचायजी राजस्थान रॉयल्सकडून पुन्हा खेळण्याची शक्यता आहे, मात्र राजस्थानने जडेजासोबत अजून एका खेळाडूची मागणी केल्यामुळे या चर्चाला एक वेगळे वळण लागण्याची शक्यता आहे. सुरुवातीला मिळालेल्या माहितीनुसार राजस्थान रॉयल्सने डेवाल्ड ब्रेविसची मागणी केली होती, मात्र आता फ्रेंचायजीने सॅम करनवर फोकस केला आहे. मथीशा पथिरानाचे नावही चर्चेत होते.




# श्रेयस अय्यरबाबत बीसीसीआयचे आस्ते कदम!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत-दक्षिण आफ्रिका मालिकेला १४ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. दोन कसोटी सामन्यांनंतर दोन्ही संघात वनडे आणि टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. कसोटी संघाच्या घोषणेनंतर आता वनडे संघात कोणाला संधी मिळणार यावर चर्चा सुरु आहे. त्यात आता श्रेयस अय्यर आगामी वनडे मालिकेला मुकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील वनडे मालिकेत अय्यरकडे उपकर्णधाराची जबाबदारी होती, मात्र दुखापतीमुळे तो मालिकेतून बाहेर पडला. पुनर्वसन सुरू असले तरी त्याला खेळवण्याबाबत बीसीसीआय कोणतीही घाई करणार नाही, अशी माहिती समोर आली आहे.

वृत्तानुसार बीसीसीआयच्या मेडिकल टीमने निवडकर्त्यांना अय्यरच्या प्रकृतीविषयी सविस्तर रिपोर्ट दिला आहे. त्यात अय्यरला मैदानात परतण्यासाठी अजून सुमारे महिन्याभराचा कालावधी लागेल, असे नमूद केले आहे. सूत्रांच्या हवाला देत वृत्तात पुढे म्हटले आहे की, अय्यरबाबत बीसीसीआय कोणताही धोका पत्करणार नाही. त्याची ऑक्सिजन पातळी काही दिवसांपूर्वी ५०पर्यंत खाली आली होती आणि त्याला उभे राहायलाही त्रास होत होता. त्यामुळे पूर्णपणे तंदुरुस्त होईपर्यंत त्याला आणखी वेळ देणे योग्य ठरेल.

# राहुल द्रविडच्या लेकाची भारतीय अंडर १९ संघात निवड

## अफगाणिस्तानविरूद्ध मालिकेत अन्वय खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा लेकही वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत क्रिकेटमध्ये आपले नशीब आजमावत आहे. अन्वय द्रविडही वडिलांप्रमाणेच फलंदाज आहे आणि याचबरोबर तो यष्टीरक्षकदेखील आहे. यासह द्रविड यांचा मोठा मुलगा समित द्रविडदेखील फलंदाज आहे.

द्रविडचा धाकटा मुलगा अन्वय आता भारतीय संघात खेळताना दिसणार आहे. भारतीय संघ अफगाणिस्तान ज्युनियर संघाबरोबर तिरंगी मालिका खेळणार आहे. ही मालिका खेळण्यासाठी बीसीसीआय भारताचे दोन अंडर-१९ संघ मैदानात



उतरवले जाणार आहेत. यासाठी संघ अ आणि ब जाहीर करण्यात आले.

अन्वय द्रविडला ब संघात यष्टीरक्षक-फलंदाज म्हणून खेळण्याची संधी देण्यात आली आहे. सर्वांच्या नजरा द्रविड ज्युनियरवर असणार आहेत. कर्नाटक अंडर-१९ संघामधील त्याच्या प्रभावी कामगिरीमुळे अन्वय द्रविडला संघात संधी मिळाली आहे. या तिरंगी मालिकेतील दमदार कामगिरीमुळे अन्वयला भारताच्या मुख्य अंडर-१९ संघात स्थान मिळू शकते.

भारतीय संघ सध्या १९ वर्षांखालील विश्वचषकासाठी तयारी करत आहे. वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे हे उच्च पातळीवर खेळत आहेत. म्हणूनच ते या तिरंगी मालिकेसाठी संघाचा भाग नसतील.